संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 6 | Marathi Monthly | Thane, 1 December 2025 to 31 December 2025 | Pages 16 | Price : 10/-

# सौ सुनार (गिरीश कुबेर) की, एक लुहार (धर्मराज्य) की....

मी स्वतः चुकूनही 'लोकसत्ता' वाचत नाही... पण, कॉ. उदय चौधरींचा फोन आला आणि त्यांनी ते, कामगारघातकी व भांडवलदारवर्गाचे छुपे हस्तक असलेल्या, गिरीश कुबेरांच्या लोकसत्तेचं (सोमवार, दि. २४ नोव्हेंबर-२०२५चं) 'संपादकीय' वाचून, त्यावर मीच प्रतिक्रिया लिहावी...असा, प्रेमळ हक्काने खूपच आग्रह केल्यावर, मी सरसावून पत्रकारितेतल्या या 'नटवरलाल'चं संपादकीय शोधायला लागलो (ते त्यांनीच लिहीलेलं असावं वा कुणाला तरी तसं सूचित केलेलं असावं, या कल्पनेनं व अंदाजानं मी लिहीतोय)....

यापूर्वीही, फार मागे अनिल बोकिलांच्या 'अर्थक्रांती'ला, हा तथाकथित बुद्धिजिवी वैचारिक-जंतू, यमक जुळवत 'अर्थवांती' म्हणाला होता...याचं कारण, जर खरोखरीच असा काही सार्वजनिक भ्रष्टाचाराच्या मुसक्या आवळू शकण्याची अंगभूत क्षमता असणारा 'प्रयोग', अस्तित्वात आलाच व यशस्वी झालाच; तर या, मी मी म्हणत अर्थसंकल्पीय विश्लेषण करणाऱ्या अर्थतज्ज्ञांना, चार्टर्ड अकाऊंट्सना (C.A.), महसूल-कर्मचाऱ्यांना फारसं कामचं उरणार नाही. **हा गृहस्थ, नावाप्रमाणेच गोयंका शेठजींचा...****पृष्ठ क्र. २ वर**



Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57

वर्ष ७८, अंक २६५, ५ रुपये, शहर आवृत्ती, पृष्ठे १० ★

अग्रलेख

तळपत्या तलवारीचे म्यान!

मालकांनी आजवर कामगार कायद्यांतील त्रुटींच्या आधारे स्वतःचे उखळ पांढरे केले. नवे कायदे कामगारांसही स्वतःचे भले करून घेण्याची संधी देतात...

मुंबई, सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५ WWW.LOKSATTA.COM

लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती !

क्रीडा

दक्षिण आफ्रिकेची कसोटीवर पकड

लोकसत्ता WWW.LOKSATTA.COM | संपादकीय | सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५ | ७

## तळपत्या तलवारीचे म्यान!

**मालकांनी आजवर कामगार कायद्यांतील त्रुटींच्या आधारे स्वतःचे उखळ पांढरे केले. नवे कायदे कामगारांसही स्वतःचे भले करून घेण्याची संधी देतात...**

**आस्थापनांस कर्मचाऱ्यांचा** रोजगार खंडित करण्याचा अधिकार नसेल तर रोजगार निर्मिती होणार नाही. म्हणजेच कर्मचाऱ्यांस कामावरून काढताच येणार नसेल तर त्यांस कामावर नेमले जाणार नाही. हे साधे तत्त्व. पण तेच लक्षात घेतले न गेल्याने आपल्याकडे 'कामगार' या घटकाविषयी फारच सांस्कृतिक, सामाजिक हुळहुळेपणा दाखवला जातो. तो दूर करून कामगार कायद्यातील सुधारणा अखेर अधिसूचित करण्याचे धैर्य दाखवल्याबद्दल सर्वप्रथम नरेंद्र मोदी सरकारचे मनःपूर्वक अभिनंदन. या सुधारणांचा प्रस्ताव पाच वर्षांपूर्वी प्रथम मांडला गेला. त्याहीवेळी 'लोकसत्ता'ने 'सुधारणांचे स्वागत' (२५ जून २०२०) या संपादकीयाद्वारे त्याचे समर्थन केले. त्यानंतर राजकीय विरोधामुळे या सुधारणांची अंमलबजावणी रखडली. कृषी कायद्यांतील रास्त सुधारणा ज्या प्रमाणे मागे घेतल्या गेल्या त्या प्रमाणे या कामगार कायदा सुधारणा बस्ताबंद केल्या गेल्या. त्यास आता मुक्ती मिळेल आणि त्यांची त्वरित अंमलबजावणीही सुरू होईल. म्हणजे त्या प्रत्यक्षात येऊ शकतील. या सुधारणांची नितांत गरज का आहे हे लक्षात घ्यायला हवे.

मुदलात या सुधारणांचा प्रस्ताव मांडला अटल बिहारी वाजपेयी सरकारने. त्यास मोदी सरकारने कायद्याचे स्वरूप दिले. त्यामुळे या कमालीच्या गुंतागुंतीच्या कामगार कायद्यांचा गुंता कमी होऊ लागेल. आजवरचे कामगार कायदे म्हणजे चारशेहून अधिक कलमे, तितकीच उपकलमे/विभाग आणि साधारण तीनशे पाने इतका ऐसपैस गुंता. त्यात उद्योग तर अडकलेच; पण कामगारही फसले. त्यात कामगार हा विषय केंद्र आणि राज्य यांच्या संयुक्त यादीत. त्यामुळे कामगार कायद्यात समानता नाही. खुद्द केंद्र सरकारच्या पातळीवरच किमान १५ कायदे आणि राज्यांच्या कामगार कायद्यांची संख्या शंभराहून अधिक अशी आजवरची स्थिती. हाच गुंता सोडवण्यासाठी अटल बिहारी वाजपेयी सरकारने माजी केंद्रीय कामगारमंत्री रवींद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय कामगार आयोग नेमला. वाजपेयी यांनी वर्मा यांच्यासारख्या काँग्रेसीकडे ही जबाबदारी दिली या राजकीय प्रगल्भतेचा आता उल्लेख करण्याचे कारण नाही. परंतु या आयोगाच्या शिफारशी अमलात आल्या नाहीत. ते राहिलेले काम मोदी सरकारकडून पूर्ण होईल आणि काही अतिमागास कायदे कालबाह्य तरी होतील आणि काहींस आधुनिक रूप मिळेल. यासाठी २९ विविध कायदे तीन संहितात विसर्जित केले गेले. त्यामुळे आता फॅक्टरी ॲक्ट, औद्योगिक विवाद कायदा, कामगार संघटना, खनिकर्म कामगार, चित्रकामगार, चित्रपटगृह कामगार, श्रमिक पत्रकार, श्रमिक बिगर-पत्रकार आदी अनेक रद्दीयोग्य कायद्यांची रवानगी रास्त ठिकाणी- म्हणजे रद्दीत- होईल. या नव्या तीन संहिता आता कामगारांची सामाजिक/ आर्थिक सुरक्षितता, औद्योगिक संबंध आणि कार्यकालीन सुरक्षितता आणि आरोग्य या मुद्द्यांस सामावून घेतील. सध्या कर्मचाऱ्यास कामावरून काढणे जिकिरीचे असते. कामगारांची एकूण संख्या १०० वा अधिक असलेल्या कारखान्यांतून कामगारांना कमी करण्यासाठी सरकारची

**... नव्या कायद्यांस पाच वर्षांपूर्वी रा. स्व. संघप्रणीत भारतीय मजदूर संघाचाही विरोध होता, त्यांची भूमिका आता बदलली; पण वास्तवाचे भान येण्यात डावे नेहमीच मागे राहतात...**

परवानगी आवश्यक. यास वळसा घालण्यासाठी यापेक्षा अधिक कामगारांची नेमणूक करावयाची वेळ आल्यास ९९ वर भरती थांबवून संबंधित उद्योजक वेगळी आस्थापना तयार करून तेथे अधिक भरती करतात. ही १०० ची मर्यादा आता ३०० होईल. नव्या अमलात कामगारांचा संप करणे सोपे असणार नाही. किमान १४ दिवसांची पूर्वसूचना दिल्याखेरीज संप करणे अशक्यच असेल. याची गरज होती. कारण आपल्याकडे काही मोजके अपवाद वगळता कामगार नेते हे नेते कमी आणि खंडणीखोर अधिक असेच आहेत. त्यांना आंजारणे-गोंजारणे म्हणजे कामगार-कल्याण. आता त्याची गरज राहणार नाही. तसेच यापुढे सर्व कामगार, कर्मचाऱ्यांना अधिकृत नेमणूकपत्र देणे आवश्यक असेल. त्यामुळे सांगायची एक रक्कम आणि द्यायची दुसरीच अशा वेठबिगारीस आळा बसेल. याचा परिणाम अंतिमतः अधिकाधिक कामगार संघटित क्षेत्रात येण्यात होईल. ही बाब गरजेची आहे. कारण विद्यमान व्यवस्थेत अनेक कामगार मोजलेच जात नाहीत. नवी रचना या असंघटित कामगारांसाठी फलदायी ठरेल. सद्यःस्थितीत 'कामगार हित' म्हणजे जेमतेम १४-१५ टक्के असलेल्या संघटित क्षेत्रातील कामगारांचे भले. त्यांचा आवाज मोठा. तो ऐकला जातो. पण असंघटित क्षेत्रातील कामगार कोणाच्या खिजगणतीतही नसतात. निश्चलनीकरणाच्या नऊ वर्षांपूर्वीच्या अल्पमती निर्णयाने हाच घटक देशोधडीला लागला. अलीकडच्या काळात असंघटित क्षेत्रच अधिक विस्तारताना दिसते. 'गिग वर्कर्स' म्हणवून घेणाऱ्यांची वाढ ही याची निदर्शक. या वर्गास कसलेही संरक्षण नाही की सामाजिक सुरक्षितता नाही. काम सुरू ठेवण्याची क्षमता आहे तोपर्यंत दाम मिळण्याची हमी. नंतर त्यांचे ते. नवा कायदा त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेची हमी देतो आणि त्यासाठी त्यांना नेमणाऱ्यांकडून काही निधी उभा करू पाहातो. ते योग्यच. त्यातून या असंघटितांना सामाजिक सुरक्षेच्या परिघात आणता येईल.

ही कायदा सुधारणा पाच वर्षांपूर्वी झाली तेव्हा आणि आताच्या राजकीय परिस्थितीत मोठा फरक दिसतो. उदाहरणार्थ राष्ट्रीय स्वयंसेवक संघप्रणीत भारतीय मजदूर संघाने यावेळी घेतलेली स्वागतशील भूमिका. या संघटनेने या कायद्याविरोधात पाच वर्षांपूर्वी नाराजीचा सूर लावला होता आणि कायद्यांचे वर्णन मालक-धार्जिणे असे केले होते. हा सूर आता बदलला हे नव्या परिस्थितीत आलेले राजकीय भान दर्शवते. त्या वेळी मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आदी राज्यांनी कामगार कायद्यांत सुधारणांचा घाट घातला होता. पण भारतीय मजदूर संघाचा बदसूर ऐकल्यावर त्यांची अंमलबजावणी थांबवली. आता तसे होणार नाही; ही आशा. 'उजवा' भारतीय मजदूर संघ या कायद्यांस आडवा येणार नाही, असे दिसते. डावे अर्थातच तसे करणार नाहीत. त्यांच्याकडून या कायद्याविरोधात आताच टिपेचा सूर लावला गेला असून २६ नोव्हेंबरास निदर्शने वगैरे केली जाणार आहेत. हे अपेक्षित म्हणायला हवे. वास्तवाचे भान येण्यात डावे नेहमीच मागे राहतात. त्यात विषय आर्थिक असेल तर डाव्यांचे मागासलेपण अधिकच पुढारलेले असते. या त्यांच्या आडमुठेपणामुळे देशातील कामगारवर्ग खरे तर रस्त्यावर आला. त्यांचे भले झाले नाही ते नाहीच; पण उलट त्यामुळे मालकांची धन झाली. आपापल्या आस्थापनांना टाळे ठोकून त्यांनी कामगारांना शब्दशः रस्त्यावर आणले आणि कामगार कायद्यांतील त्रुटींच्या आधारे स्वतःचे उखळ पांढरे करून घेतले. नव्या कायद्यांमुळे कामगारांसही स्वतःचे भले करून घेण्याची संधी मिळेल. कामगार संघटनांना आणि त्यातही नेते म्हणवून घेणाऱ्यांस त्यांनी फांदा घालण्याची संधी देऊ नये म्हणजे झाले.

'जगातील कामगारांनो एक व्हा' ही मार्क्सने दिलेली हाक तेव्हा योग्य. पण वेतन, भत्ते वगैरे वाढू लागले की एक होण्याची गरज कामगारांसही वाटत नाही. ती तशी वाटत राहावी म्हणून त्यांना सतत उपेक्षित ठेवणे अयोग्य. सुखवस्तू जगण्याची अपेक्षा ठेवणारा कारकून आणि कामगार यांच्या अंतःप्रेरणा फार भिन्न असतात असे मानणे हा भाबडेपणा. गरिबीचे उदात्तीकरण करण्याच्या सोसात तो खपून गेला. आता तसे करणे खुद्द कामगारांनाही अमान्य असेल. ''कामगार आहे मी; तळपती तलवार आहे'', असे ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे म्हणून गेले ते योग्यच. पण तलवारीची धार कायम राहावी यासाठी म्यानही चांगले हवे. नवे कामगार कायदे ते पुरवतात. म्हणून त्यांचे स्वागत.

# कामगारांचा मसीहा, म्हणून ज्यांना तमाम कामगारवर्ग ओळखत होता; त्या ॲड. किल्लेदारांच्या शोकसभेच्या निमित्ताने....

ॲड. किल्लेदारांचं दीर्घ आजारानंतर नुकतंच काही दिवसांपूर्वी झालेलं निधन, ही तशी वयोमानानुसार पहाता, फार धक्कादायक घटना नसली; तरी प्रश्न उरतोच की, मग अन्यायी-अत्याचारी व्यवस्थापकीय-मंडळींच्या/मालकवर्गाच्या संवेदनशून्य-कारस्थानी वृत्तीला बळी पडलेल्या...ज्या असंख्य कामगारांच्या नोकऱ्या, आपलं वकिली-कौशल्याच्या व सचोटीच्या जीवावर किल्लेदारांनी वाचवल्या...त्यांनी त्यांना दिलेले लाख लाख दुवे कुठे गेले? किल्लेदारांना शतायुषी करण्यात, ते कामी का आले नाहीत...असे एक ना अनेक प्रश्न, आपल्या दुःखी मनाला पडल्याशिवाय रहात नाहीत, एवढं त्यांचं कर्तृत्त्व मोठं होतं आणि तेवढीच मोठी त्यांची गरज, आजच्या अतिशय कठीण अशा, '४ काळ्या कामगार-संहितां'नी लादलेल्या 'कामगारविरोधी कालखंडा'त आहे!

कामगारांच्या सरणावर आपली 'पोळी' भाजून घेत, व्यवस्थापनांची वकिली (खरंतर, दलाली) करुन आपल्या घरावर सोन्याची कौलं चढवणारा धनाढ्य वकीलवर्ग, आजुबाजुला मोठ्या संख्येनं मौजूद असताना...त्या पातकी-ऐश्वर्याची भूल, आपल्याला अजिबात पडू न देणारा, ॲड. किल्लेदार, हा खरा 'अल्लाचा बंदा' ...पृष्ठ क्र. २ वर



अंतरंग



ज्वालामुखी धगधगतो आहे....

....राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

पृष्ठ क्र. ९







काँग्रेसवाल्यांना झालंय तरी काय...???

....राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

पृष्ठ क्र. १३

अखेर झाडांनीच, सयाजी शिंदेंना मैदानात खेचलं...!!!

....विजय चोरमारे

पृष्ठ क्र. १६

# ‘कामगार–विरोधी’ नवीन संहिता...

निवडणूक जिंकण्याचा ‘फॉर्म्युला’ महाराष्ट्रात टेस्ट केला. बिहारमध्ये त्यावर शिक्कामोर्तब झाले. त्यातून राजकीय आत्मविश्वास वाढलेल्या केंद्र सरकारने, गेली पाच वर्षे आणणार आणणार म्हणून सांगितलेल्या वेतन, औद्योगिक सबंध, सामाजिक सुरक्षा आणि कामाच्या ठिकाणाची परिस्थिती यांना नियमित करणाऱ्या चार स्वतंत्र कामगार-संहिता तातडीने लागू केल्या आहेत. कोणत्याही सत्ताधाऱ्यांना परत परत निवडून यायचे असते. सहाजिकच आपल्या मोठ्या, देशभर फूटप्रिंट असणाऱ्या आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील अशा निर्णयाचे, भविष्यात निवडून येण्यावर विपरीत परिणाम होऊ द्यायचे नसतात. म्हणून, या संहिता कामगार हिताच्याच कशा आहेत? अशी प्रतिपादने, बातम्या, पानभर जाहिरातींमधून लोकांसमोर मांडल्या जात आहेत.

या चार कामगार संहितांचा परिणाम दोन पक्षांवर होणार आहे : कॉर्पोरेट/एम्प्लॉयर/नोकरी देणाऱ्यांवर आणि कामगारांवर/नोकरी करणाऱ्यांवर.


केंद्र सरकार उच्चस्वरात काहीही म्हणो, हा परिणाम विषम असणार आहे. दुसरे म्हणजे, या दोन पक्षांच्या सामर्थ्यात जमीन अस्मानाचा फरक आहे.

कसे , ते बघू या...

### कंपन्या/एम्प्लॉयर/नोकरी देणारे :

आता कंपन्या या संहितांमधील तरतुदींचा फायदा उठवत, आपल्या कामगार-विषयक धोरणात धडाधड बदल करणार आहेत.

**उदाहरणार्थ :** आता कायमची नोकरी हा प्रकार नसेल, कोणालाही कामावरून काढता येईल. ३०० पेक्षा कमी कामगार असतील तर, कंपनी बंद करण्यासाठी शासनाची पूर्व परवानगी घेण्याची गरज नसणार, इत्यादी इत्यादी.




### कामगार/नोकरी करणारे :

संहितांमध्ये कामगार हिताच्या ज्या गोष्टी सांगितल्या जात आहेत, ते सर्व शब्दांचे गुच्छ आहेत. The Devil Lies in Details and Implementation. राजकीय अर्थव्यवस्थेचे हे ‘ट्रेड सिक्रेट’ आहे... म्हणजे, नेहमीच असते.

### काही उदाहरणे बघू या...

प्रत्येक कामगाराला नियुक्तीपत्र दिले जाईल, असे म्हटले आहे. समजा, एखाद्या कामगाराला ते दिले गेले नाही आणि त्याने आग्रह धरला तर, त्याला सांगितले जाईल की, काम करायचे तर कर, नाहीतर दुसरा गेटबाहेर उभा आहे. मग तो कामगार नियुक्तीपत्राचा आग्रहच सोडून देईल ना?

किमान वेतन दिले जाईल, असे सांगितले जाते. परंतु, ‘किमान वेतन किती? आणि ते कोण ठरवणार? ते महागाईप्रमाणे वाढेल का? इथे तर, कागदोपत्री असलेले वेतन आणि प्रत्यक्षात मिळालेले वेतन यात सर्रास तफावत असते!

### ट्रेड युनियनचा ‘रोल’ काय असेल?

ताकदवान कंपनी व्यवस्थापनासमोर, एक सुटा कामगार म्हणजे, महाकाय गवत कापणाऱ्या स्वयंचलित मशीनसमोर एक गवताचे पाते. जरा ताठ झाले की, ते खटकन कापले जाणार. सामुदायिक ‘ट्रेड युनियन’ असेल; तरच, एकट्या कामगाराचा थोडाबहुत निभाव लागतो. इथे तर एका एका कामगाराबरोबर स्वतंत्र ‘एम्प्लॉयमेंट ग्रीमेंट’ करण्याची पद्धत रुजत आहे. कसली ‘ट्रेड युनियन’ आणि कसले काय? आता तर, ट्रेड युनियनची मान्यताच क्षुल्लक कारणांमुळे रद्द केली जाणार आहे.

याआधी कामगार कल्याणासाठी केलेल्या योजनांचे काय भजे झाले? आश्चर्य म्हणजे, त्याची माहिती कोणीही देत नाही. दोनच उदाहरणे सांगतो...

(अ) बांधकाम मजुरात जायबंदी होण्याचे प्रमाण मोठे आहे. त्यांच्यासाठी ‘सेस फंड’ स्थापन करुन, त्यांना मदत करण्याचा प्रस्ताव वीस वर्षापूर्वी मंजूर झाला. त्याचे काय झाले?

(ब) ‘गिग वर्कर्स’साठी ई-श्रम पोर्टल सुरू केले होते. देशात एक कोटी ‘गिग वर्कर्स’ आहेत. एका अहवालानुसार, पाच वर्षांत फक्त पाच टक्के ‘गिग वर्कर्स’ची नोंदणी झाली आहे.

आम्ही चांगल्या, कल्याणकारी योजना बनवतो. त्यातून ज्यांना लाभ होणार आहे, त्यांनी हालचाल केली नाही तर दोष कोणाचा? प्रस्थापित व्यवस्थेची उद्या हीच उत्तरे असणार आहेत. विशेष म्हणजे, गेली अनेक दशके हीच उत्तरे दिली जात आहेत!

लहान मुले स्वतःचे संरक्षण स्वतः करु शकत नाहीत, म्हणून तर आईवडील त्यांचे संरक्षण करतात. ‘मायबाप-सरकार’ या संकल्पनेमागेदेखील हेच तत्व आहे. पण, आता शासन म्हणते की, आम्ही जनतेचे मायबाप नाही!

बाकी ‘डिटेल्स’ दुय्यम आहेत. त्यात भर म्हणजे, कामगारवर्गाची व ट्रेड युनियनची आधीच फाटलेली, त्यात उरली सुरली कवच कुंडलेही काढून घेण्यात येणार आहेत...!!!

**– *संजीव चांदोरकर***

---

कामगारांच्या हिताचे कायदे रद्दबातल ठरवून, त्याठिकाणी कामगारविरोधी व मालकधार्जिणे चार काळे-कायदे लादून, देशभरातील श्रमिकांना गुलामगिरीत ढकलण्याचं महापातक, केंद्र सरकारकडून घडलेलं असून, त्याचाच निषेध व्यक्त करण्यासाठी ‘संविधान दिना’चे औचित्य साधून, देशभरातील कामगार संघटनांनी, दि. २६ नोव्हेंबर-२०२५ रोजी, संपूर्ण भारतात निदर्शने/आंदोलने केली. त्याच पार्श्वभूमीवर, ‘महाराष्ट्र राज्य कामगार संघटना संयुक्त कृती समिती’च्या वतीने, भारताच्या राष्ट्रपतींना, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून, दि. २६ नोव्हेंबर-२०२५ रोजी, निवेदन देण्यात आले. सदर निवेदन ठाण्याचे अपर-जिल्हाधिकारी श्री. हरिश्चंद्र पाटील यांनी स्विकारले. याप्रसंगी ‘सर्व श्रमिक संघा’चे अध्यक्ष रवी नायर, ‘टीयूसीआय’चे अध्यक्ष रवी जोशी, ‘भारतीय महिला फेडरेशन’च्या कार्याध्यक्षा निर्मला पवार, ‘आयटक’चे कार्याध्यक्ष उदय चौधरी, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे कार्यालय-प्रमुख संजय दळवी, ‘सीमेन्स वर्कर्स युनियन’चे अध्यक्ष मनोज बोडके, ‘श्रमिक जनता संघा’चे अध्यक्ष जगदीश खैरालिया, ‘ठाणे जिल्हा मध्यवर्ती शासकीय कर्मचारी महासंघा’च्या अध्यक्षा श्रीमती पुजारी, ‘महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी युनियन’चे कार्याध्यक्ष राजेश सिंग आणि ‘राज्य सहकारी मध्यवर्ती संघटने’चे अध्यक्ष भास्कर गवळी आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# ठाण्यात कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कवितांचा 'जागर' संपन्न!

## प्रज्ञा पवार, अरुण म्हात्रे यांच्यासह दिग्गज कवींनी उलगडला सुर्व्यांचा जीवनपट

**ठाणे (प्रतिनिधी) :** 'कामगार-कवी' अशी लोकमान्यता असणाऱ्या पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या 'जन्मशताब्दी'निमित्त ठाण्यात शनिवार, दि. २२ नोव्हेंबर-२०२५ रोजी, नारायण सुर्वे यांच्या कवितांचा जागर संपन्न झाला. 'कामगार-कवी पद्मश्री नारायण सुर्वे जन्मशताब्दी महोत्सव समिती, ठाणे जिल्हा' यांच्या वतीने, ठाण्याच्या मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात दिग्गज कवी आणि डाव्या चळवळीतील मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत हा सोहळा मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. या कवी-संमेलनात, प्रज्ञा दया पवार, अरुण म्हात्रे, छाया कोरेगांवकर, सुरेखा पैठणे, अनिता भारती, शिवा इंगोले, शिवराम सुकी आणि बबन सुरवदे या चळवळीतील कवींनी आपल्या कविता सादर केल्या; तर, ज्येष्ठ आंबेडकरी साहित्यिक अर्जुन डांगळे यांनी, नारायण सुर्वे : एक विचार यावर आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी नारायण सुर्वे यांच्या जीवनपटावरील एक लघुपटदेखील सादर करण्यात आला. दरम्यान, कार्यक्रमाची सुरुवात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हौतात्म्य पत्करलेल्या, हुतात्मा स्मारकाच्या प्रतिकृतीला अभिवादन करुन व दिपप्रज्वलनाने झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कामगार-नेते राजन राजे होते तसेच, प्रमुख पाहुणे म्हणून, 'महाराष्ट्र राज्य लालबावटा शेतमजूर युनियन'चे कार्याध्यक्ष राम बाहेती हे मंचावर उपस्थित होते. यावेळी आपले विचार मांडताना दलित साहित्यिक अर्जुन डांगळे यांनी, नारायण सुर्वे यांच्या कवितेला प्रस्थापित समीक्षकांनी न्याय्य दिला नसल्याचे बोलून दाखवले. यावेळी पुढे बोलताना डांगळे म्हणाले की, कवितेच्या तळाशी जाऊन भूमिकेला पुरेपूर न्याय्य देणे हीच सुर्वे यांची मूळ धारणा होती. त्यांच्या कवितांमध्ये मार्क्सवाद रुजला होता, ते दलित साहित्यात रमलेले कष्टकरीवर्गाचे प्रतिनिधी होते. नारायण सुर्वे यांनी, राजकीय व सामाजिक भूमिका प्रामाणिकपणे, तेवढ्याच प्रखरतेने आपल्या कवितांमधून मांडून, नवीन प्रतिभाविश्व निर्माण केल्याचे अर्जुन डांगळे म्हणाले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राम बाहेती आपल्या भाषणात, आपले विचार मांडताना म्हणाले की, सद्यस्थितीत मार्क्सवादावर जगभरात हल्ले सुरु आहेत. नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीप्रमाणेच, कम्युनिस्ट पक्ष व 'आरएसएस'चेदेखील हे शताब्दी वर्ष आहे; मात्र, फक्त भारतातच नव्हे; तर, जगभरात डाव्या चळवळीवर या धर्मविद्वेशी प्रवृत्तीचे हल्ले सुरु आहेत. संपूर्ण जगाला, 'आरएसएस'सारख्या जातीय संघटनांपासून सांस्कृतिक धोका निर्माण झालाय. याच प्रवृत्तींनी मनुस्मृतीचं समर्थन केले, इतिहासाचे विकृतीकरण केले आणि आता काळे कामगार कायदेही याच विचारधारेने, कष्टकऱ्यांवर लादून देशातील 'कामगार-चळवळ' उध्वस्त करण्याची एकहाती मोहिम हाती घेतली आहे. ज्या कामगारांनी शंभर वर्षांपूर्वी संघर्ष करुन, कामगारहिताचे कायदे पदरात पडून घेतले, तेच कायदे आता काळ्या संहितेच्या स्वरुपात कामगारांच्या वाट्याला आलेत. आता, कोणाही कामगार संघटनेला संप पुकारता येणार नाही, आपल्या न्याय्यहक्कासाठी भांडता येणार नाही, रस्त्यावर लोकशाहीमार्गाने आंदोलनं करता येणार नाहीत. देशातला शेतकरी व शेतमजूर संपवून, त्यांना शेतीक्षेत्रातही भांडवली व्यवस्था रुजवायची असून, ती मोडून काढण्यासाठी आपण सर्वांनी प्राणपणाने संघर्ष करण्याशिवाय पर्याय नसल्याचे बाहेती म्हणाले. दरम्यान, आपल्या अध्यक्षीय भाषणात ...पृष्ठ क्र. ७ वर









ठाण्यात स्थापन झालेल्या, 'कामगार-कवी पद्मश्री नारायण सुर्वे जन्मशताब्दी समिती'ची आढावा बैठक रविवार, दि. २ नोव्हेंबर-२०२५ रोजी, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'च्या कार्यालयात संपन्न झाली. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगारनेते मा. राजन राजे, डाव्या चळवळीतील नेते अविनाश कदम, उदय चौधरी, आंबेडकरी विचारांचा वारसा जपणारे ठाण्यातील ज्येष्ठ वकील ॲड. नाना अहिरे, आंबेडकरी चळवळीतील विचारवंत आनंदा होवाळ, 'धर्मराज्य पक्षा'चे सचिव निरंजन म्हात्रे, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सचिव समीर चव्हाण, 'धर्मराज्य पक्षा'चे ऐरोली विधानसभा सचिव रत्नदीप कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, या पार पडलेल्या आढावा बैठकीत, 'कामगार-कवी पद्मश्री नारायण सुर्वे जन्मशताब्दी समिती'च्या वतीने शनिवार, दि. २२ नोव्हेंबर-२०२५ रोजी काव्यसंमेलनाचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले. हा कार्यक्रम, मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे येथे सायंकाळी ५ ते रात्री ९ वा.पर्यंत संपन्न होणार असून, काव्यसंमेलनात अरुण म्हात्रे, नीरजा, छाया कोरेगावकर, शिवा इंगोले, शिवराम सुखी आणि अनिता भारती हे मान्यवर कवी, आपल्या कवितांचे सादरीकरण करणार आहेत. तसेच, दलित साहित्यिक अर्जुन डांगळे हे, 'कविवर्य नारायण सुर्वे कविता आणि विचार' या विषयावर आपले विचार व्यक्त करणार आहेत. या काव्यसंमेलनाचे अध्यक्षपद 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगारनेते मा. राजन राजे भूषविणार आहेत; तर, ज्येष्ठ पत्रकार व राज्यसभेचे माजी खासदार कुमार केतकर आणि ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ



विश्वास उटगी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याप्रसंगी कविवर्य नारायण सुर्वे यांच्या जीवनावरील लघुपट दाखविण्यात येणार असून, तरुणपिढीला नारायण सुर्वे यांचे कार्य माहित व्हावे, त्याचप्रमाणे त्यांच्या विचारांचा वारसा सर्वसामान्य कामगार-कष्टकरीवर्गाला कालवा यासाठी 'कामगार-कवी पद्मश्री नारायण सुर्वे जन्मशताब्दी समिती' कार्यरत राहील, अशी माहिती राजन राजे यांनी यावेळी दिली.

# ॲड. किल्लेदारांच्या शोकसभेच्या निमित्ताने....

होता...आणि, म्हणूनच आम्हाला त्यांचा प्रचंड अभिमान होता व तो तसा मरणोत्तर देखील राहीलच. Lawyers are Liars, ही वकीलवर्गासाठी सर्वसाधारणपणे वापरली जाणारी उपरोधिक उक्ति, वक्रोक्ती अथवा व्याजोक्ती...किल्लेदारांनी अंगावर पडलेल्या पालीसारखी दूर भिरकावून दिली, ती कायमचीच...एकप्रकारे, त्यांनी तो वकिलीचा काळा कोट अंगावर चढवतानाच, स्वतःशी आणि नियतीशी केलेला Lawyer are Loyals असा एक स्पृहणीय-दुर्दम्य करार होता!

अशा शोकसभेप्रसंगी, जी कर्तृत्ववान व्यक्ति आपल्यातून निघून गेलेली असते, तिच्या व्यक्ति-वैशिष्ट्यांबद्दल अनेकांनी सविस्तर आपापलं म्हणणं मांडलेलं असतंच...म्हणूनच, त्याची खोलात जाऊन पुन्हा उजळणी न करता; मला जे प्रत्यक्षात दोन प्रसंगी त्यांचे जाज्वल्य अनुभव आले, ते थोडक्यात मांडतो....

प्रसंग पहिला : वर्ष-१९९१च्या 'खाउजा-धोरणा'चा राक्षसी वरवंटा, संपूर्ण देशभरात श्रमिकवर्गावर हळूहळू फिरायला लागला असतानाच...वर्ष-२००१च्या 'कल्याणी आणि सिपला' या स्वतंत्र व वेगवेगळ्या अशा दोन धक्कादायक सर्वोच्च न्यायालयीन निकालांनी, कामगारांच्या हाती असलेला डाव्या-चळवळीचा 'लाल बावटा' खाली उतरवून, देशात 'कंत्राटी-कामगार पद्धती'ल्या गुलामगिरी व नव-अस्पृश्यतेला 'हिरवा झेंडा' दाखवला. त्यानंतर साधारण सहासात वर्षांनी, कंत्राटी-कामगार पद्धतीमुळे कामगारविश्वाला व एकूणच कामगार-चळवळीला फार घरघर लागत असल्याचं निदर्शनास आल्याने, मी ठाण्याच्या लालनिशाण पक्ष कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली व कंत्राटी-कामगार पद्धतीच्या महासंकटाबाबत त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. त्या चर्चेदरम्यान, कम्युनिस्ट नेतेमंडळी अमेरिकेशी होऊ घातलेल्या नागरी-आण्विक सहकार्य (U.S.-India Civil Nuclear greement) कराराच्या विरोधासाठी संसदेतील आपले एकूण ६३ व राज्यसभेतील १३ खासदार पणाला लावतायत...पण, कंत्राटी-कामगार पद्धतीविरोधात, ते असे शड्डू ठोकत संसदीय-मैदानात का उतरायला तयार नाहीत?

...तेव्हा, क्षणभर थांबून, दीर्घ श्वास घेत ते म्हणाले, राजन राजे, आम्ही कम्युनिस्ट मंडळी, कितीही प्रामाणिक व धडपडणारे असलो; तरी 'घोडचुका', आम्ही करणार नाही, तर त्या कोण करणार?

प्रसंग दुसरा : ज्या कंपनीचं नाव, भारताच्या औद्योगिकविश्वात, तेथील अनुपम कार्यसंस्कृतीमुळे व तेथील उच्चतम वेतनमान व 'सहा आकडी' (रु. एक लाखाहून अधिक) बोनसमुळे सर्वत्र गाजत होतं व गौरविलं जात होतं...त्याच 'सुल्झर पंप्स्, दिघा नवी मुंबई' या कंपनीत, वर्ष-२०१९च्या उत्तरार्धात, अचानक झालेल्या संपूर्ण व्यवस्थापकीय-बदलाने (तत्पूर्वी, काहीकाळ आधी, कंपनी-मालकीतही बदल झाल्याचं समजतं) एकच हाहा:कार उडाला...तो झालेला संपूर्ण बदल, किती भयानकरित्या 'कामगारविरोधी व कामगारघातकी' होता, ते पुढील काळ लवकरच उलगडून दाखवणार होता. गद्दार व नीच कामगारांच्या एका अल्पसंख्य गटाला हाताशी धरुन,

'कामगार-नेता' म्हणून व्यक्तिशः माझ्या व माझ्या कुटुंबियांच्या नाहक खोट्या बदनामीचं, अगदी पद्धतशीर ठरवून, भयंकर सत्र चालू करण्यात आलं. शिवाय, आमच्यावर खोट्यानाटया केसेस दाखल करण्याची 'व्यवस्था' केली गेली. डझनावरी बाऊन्सर्स (त्यातले, काही शस्त्रसज्ज) वगैरे वापरत, कामगार व पोलिस खातं अंकित करुन ठेवत, कामगारांना खोट्यानाट्या कारणांनी धडाधड निलंबित करत आणि त्यातून संपूर्ण कामगार-कर्मचारीवर्गावर प्रचंड दहशत बसवत, ('कंत्राटी-कामगार' कंपनीत मोठ्याप्रमाणावर कामावर घेण्याच्या कुटील उद्देशाने)...कामगार प्रथां'मध्ये (Unfair Labour Practices) मोडणारे उद्योग सर्रास केले गेले!

अशा, कल्पनातीत धक्कादायक व धोकादायक परिस्थितीत डोकं सुन्न झालेलं असताना, कामगारांचे दावे लढणारा, डोळ्यासमोर आशेचा व कमालीचा अनुभवी, असा एकच सूर्यकिरण दिसत होता, तो म्हणजे पितृतुल्य व्यक्तिमत्व असलेला, या क्षेत्रातील दिग्गज-महर्षी ॲड. किल्लेदार!

...पण, तोपर्यंत किल्लेदार तब्येतीच्या मधुमेही (Diabetic) त्रासाला कंटाळून व वयपरत्वेसुद्धा, वकिलीपेशाच्या जवळपास निवृत्तीच्या उंबरठ्यावर उभे होते...अशा अवघड परिस्थितीत ते आमचे दावे हाती घेतील, ही शक्यता तशी दुरापास्तच होती...तरीही, मी त्यांना घरी जाऊन परिस्थितींचं गांभीर्य समजावून सांगण्याचा निर्धार केला. निवृत्तीपर एक अपवाद म्हणून वकीलपत्र घेण्याची गळ घालण्याचा मनात विचार घोळवतच माझ्या मोजक्या शिलेदारांसह मी त्यांच्या मुंब्र्याच्या निवासस्थानी गेलो. खडा न् खडा अकस्मात घडलेला भयंकर घटनाक्रम टप्याटप्याने सांगितल्यावर, ते उत्स्फूर्तपणे उद्गारले, राजे, मला तुमच्या संपूर्ण कामगारकार्याची सगळी माहिती आहे. अनेक कंपन्यांची व्यवस्थापनं, विशेषतः, बहुराष्ट्रीय कंपन्यांची व्यवस्थापनं 'कामगारांचं-कंत्राटीकरण' (Implementation Spread of Contract-Labour System) करण्याकामी त्यांचं खच्चीकरण करण्यासाठी म्हणून...असले नेत्यांच्या बदनामीचे; तसेच, कामगारांचं घाऊक-निलंबन वगैरे करत युनियन-तोडाफोडीचे 'बेकायदेशीर उद्योग' करत असतातच; पण, जे तुमच्याकडे चाललंय, तसं कधिही घडताना मी माझ्या प्रदीर्घ कारकीर्दीत पाहिलेलं नाही...हे अतिच चाललंय! तेव्हा, मी तुम्हाला आणि तुमच्यासोबत असलेल्या एकूणएक सगळ्या सुल्झरच्या निष्ठावान कामगार-कर्मचारीवर्गाला वचन देतो, 'माझ्या देहात प्राण असेपर्यंत व माझा शेवटचा श्वास चालू असेपर्यंत, मी तुमचा लढा लढणारच'... आता, एक तर मी लढता लढता मरेन किंवा मरण्यापूर्वी जिंकेन, तुम्ही बिलकूल काळजी करु नका...आता ही लढाई माझीसुद्धा लढाई झालीय, असं समजा!

...आणि, खरोखरीच दिल्या वचनाला जागत, आमचे किल्लेदार वकीलसाहेब, त्याच झुंजार बाण्याने शेवटपर्यंत लढले! इस्पितळात अखेरचे आम्ही त्यांना भेटलो; तेव्हा, तेथे त्यांचे कुटुंबिय होते व माझ्यासोबत विनोद मोरे, समीर चव्हाण हे सहकारी होते...आम्हाला पहाताच, त्या अतिशय कृश व पूर्ण थकलेल्या देहात पुन्हा प्राणाचा संचार झाला असावा आणि ते विनोदकडे अगदी क्षीण स्वरात, धाप लागलेली असतानासुद्धा न्यायालयीन दाव्यांबाबत बोलण्याचा कसोशीने प्रयत्न करु लागले...मला ती त्यांची प्राणांतिक धडपड बघवेना, म्हणून मी पुढे होऊन त्यांना अजिबात बोलायचं नाही, असं प्रेमळ हक्काने बजावलं... म्हटलं, किल्लेदारसाहेब, तुम्ही तर आमची 'नैय्या' एव्हाना पार करुन ठेवलीयत, फिर अब हमे डरना क्या...तेव्हा, त्यांनी जोडलेले हात, आजही आणि उद्याही डोळ्यासमोर कायम तरळत रहातील...हीच ती, डाव्या चळवळीतल्या अशा मंडळींची, श्रमिकांप्रतिची 'मृत्युंजय-निष्ठा', त्या निष्ठेला 'धर्मराज्य'चा 'लाल सलाम'...लाल बावटे की जय!

***...राजन राजे***, अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ व सुल्झर पंप्स् इंडिया एम्प्लॉईज् युनियन...(SEU) सेऊ

*महाराष्ट्राच्या सार्वजनिक हिताच्या खटल्यांचे कामकाज पाहणारे व पीडितांसाठी न्यायालयीन लढाई लढणारे निर्भीड वकील असीम सरोदे यांची सनद, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिल यांनी, राजकीय दबावापोटी सुडबुद्धीने आणि आकस बाळगून, तीन महिन्यांसाठी रद्द केल्याच्या निषेधार्थ, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने सोमवार, दि. १० नोव्हेंबर-२०२५ रोजी, सायंकाळी ५ वा. पासून ते ७ वा. पर्यंत, ठाणे रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्र. १च्या बाहेर, सॅटीस पुलाखाली मूक-निदर्शने आयोजित करण्यात आली होती. 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगारनेते मा. राजन राजे यांच्या आदेशानुसार आणि पक्षाचे सचिव नरेंद्र पंडित यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या मूक-निदर्शनाच्या या कार्यक्रमासाठी 'धर्मराज्य पक्षा'चे प्रवक्ते समीर चव्हाण, पक्षाचे खजिनदार अजित सावंत, ठाणे लोकसभा महिला समन्वयक पौर्णिमा सातपुते, नवी मुंबई सचिव नरेंद्र शिंदे, ठाणे शहरातील सामाजिक कार्यकर्ते गजानन पाठारे आदी मान्यवर पदाधिकाऱ्यांसह, संजय दळवी, सोपान चौधरी, संजय उघडे, दादा मोरे, रामचंद्र गावडे, विकास पाटील इत्यादी कार्यकर्ते आणि कामगार सभासद उपस्थित होते.*



# सौ सुनार (गिरीश कुबेर) की, एक लुहार (धर्मराज्य) की....

...पृष्ठ क्र. १ वरुन

**गलेलठ्ठ पगार घेत पैशाने 'कुबेर'...पण, सद्‌बुद्धीच्या प्रांतात मात्र अत्यंत 'दरिद्री' असणारा आहे.** इथे हे लक्षात घेणं अत्यावश्यक आहे की, कॉर्पोरेटीय वा अन्य कुठल्याही क्षेत्रात, बेहिशोबी मोठे पगार/भत्ते ओरपणारे CEO, MD, CMD, CFO...हे खरंतर, सगळ्यात मोठे, पण 'छुपे' भ्रष्टाचारी असतात...असा अतिरेकी मोठा पगार घेत रहाणं, हाच एक स्वतः मोठा भांडवली 'भ्रष्टाचार' आहे! जगभरात निम्नतम वेतनमान व सर्वोच्च वेतनमान यात जास्तीतजास्त गुणोत्तर १ : १२ राखलं जाण्याचा आग्रह धरला जात असताना...हे भांडवली-बोके अथवा भांडवली-बांडगुळं, बेसुमार पगार/भत्ते, सवलती उपटत रहातात!

भांडवलशाहीपुढे कायम 'मान' तुकवून जगणाऱ्या तथाकथित बुद्धिजीवी (यांच्यालेखी, डावे 'आंदोलनजिवी') बांडगुळांना, देशाच्या संपत्तीच्या खऱ्याखुऱ्या निर्मात्याची तळपती तलवार 'म्यान' होण्याची स्वप्न पडतं रहाणं, आपल्याला सहजी समजून घेता येतं! असंख्य नीतिमान बुद्धिजिवींनी (IIT, IIM, C, MB, Medical Fraternity, Lawyers वगैरे वगैरे), त्यांना अतिश्रीमंतीकडे नेण्यासाठी खुणावणाऱ्या करियरची तलवार 'म्यान' करत, समाजाच्या भल्यासाठी 'डाव्या चळवळी'त शब्दशः झोकून देऊन काम करताना पहाताना, खरोखरीच नतमस्तक व्हायला होतं. आजच्या पिढीच्या व पुढील पिढ्यापिढ्यांच्या अंतिम हितासाठी अहोरात्र धडपडणाऱ्यांना, हे 'ठोकसत्ता'वाले, कुठल्या आधारावर ठोकू पहातायत? 'लोकसत्ता' हे आता, निव्वळ दैनिक नसून या 'कुबेरी-कालौघात', श्रमिकांची उडवली जाणारी 'क्रूर थट्टा' बनलीय... गरजेनुसार, परिस्थितीनुसार सरड्यासारखे रंग बदलत, भांडवली इशाऱ्यावर जनमानसाची दिशाभूल करण्याकामी लावलेला 'सट्टा', म्हणजे 'लोकसत्ता' (When you can't convince, confuse...धर्तीचा)! पूर्वापार अनेकवेळा एक्स्प्रेस समूहाच्या कर्मचारीवर्गाने आमच्याशी 'युनियन' करण्यासंदर्भात संपर्क साधलाय; पण, तेथील कार्पोरेटीय-दहशतवादाने (Corporate-Terrorism), अन्याय-शोषण असूनही त्यांची युनियन करण्याची हिंमतच होत नाही... अशीच परिस्थिति बहुतेक सगळ्याच वृत्तपत्रांतील आहे. जुने कामगार-कायदे एवढे तकलादू की, पाश्चात्य देशांप्रमाणे 'अनुचित कामगार प्रथां'साठी (Unfair Labour Practices) व्यवस्थापकांना / मालकांना ३ वर्षांच्या तुरुंगवासासह व्यक्तिगतरित्या फार मोठ्या आर्थिक-दंडाच्या तरतुदी, त्यात अजिबातच नाहीत (एक दिवसाचाही तुरुंगवास तर सोडाच; पण आर्थिक दंडही जास्तीतजास्त रु.५०००/- एवढा नगण्य होतो)...म्हणूनच, जे काही षंढ कामगार-कायदे आहेत; ते ही कामगार-चळवळ कमजोर केली गेल्याने...'कंपनी-दहशतवादा'तून कामगार-कायदे खुलेआम धाब्यावर बसवणं, हल्ली कंपन्यांमध्ये सगळीकडे सुरुच असतं. ही सगळीच वृत्तपत्रे आणि सगळा इलेक्ट्रॉनिक-मिडीया, पूर्णतया 'कंत्राटी-कामगार पद्धती'तल्या गुलामगिरीवरच आज विनासायास चालतोय...जी कंत्राटी-कामगार पद्धत, कालपरवापर्यंत 'बेकायदेशीर' होती; ती, १९९१च्या धोरणापश्चात कशी काय बेलगाम चालू झाली, हा प्रश्न या कुबेर महाशयासारख्यांना विचाराच! याचं कारण, कामगार-कायदा मोडला म्हणून न्यायालयात जाण्यात फारसा अर्थ तेव्हाही नव्हता...कामगारांचे न्यायालयीन-दावे वर्षानुवर्ष 'जाणिवपूर्वक' रेंगाळवले जातात; कामगार निवृत्त होतो किंवा वर जातो, तरी निकाल हाती येत नाहीत. मिळतो तो केवळ, न्यायालयीन 'निकाल' असतो; तो 'न्याय' असेलच, याची बिलकूल खात्री नसते; त्यातून न्यायाधीश, हे कुबेरांसारखेच 'छुप्या' संघीय म्हणजेच, भांडवली-विचारसरणीचे असतील तर?

कुबेरांसारख्या बड्यांचे पगार/भत्ते एवढे मोठे असतात की, या व्यवस्थापकीय 'टॉप'च्या लोकांना खरंतर 'वाममार्गा'ने पैसा (वरची कमाई) कमावण्याची इच्छाच होऊ नये. त्यासाठीच, ते अनैतिक व अन्याय्य असे गलेलठ्ठ पगार/भत्ते त्यांना दिलेले असतात (पण, तरीही 'भस्म्यारोग' लागलेल्या त्यांच्यापैकी अनेकांना ती इच्छा अनावर होते, हा भाग वेगळाच); पण, अनेक खालच्या स्तरावर तुटपुंज्या पगारावर काम करणारे आणि वृत्तपत्रीय-जाहिराती गोळा करण्याचं व चढ्या दराचे कॅलेंडर-दिवाळी अंक-डायऱ्या वगैरे विकण्याचं दिलेलं 'कॉर्पोरेटीय-टार्गेट' पुरं करण्यासाठी सतत धमकावले जाणारे अनेक 'वंचित' पत्रकार, जर 'वरकड-कमाई'साठी सर्रास राजकारण्यांकडून 'पाकिट' घेऊन काम करत असतील व त्याप्रमाणे, बातम्या रंगवत असतील...तर, त्यांना हे महाशय, कुठल्या नावाने संबोधणार आहेत?

लक्षात ठेवा, आपल्या सोयीसाठी व इतरेजनांवर बिनबोभाट 'राज्य' करण्यासाठी...पाचदहा टक्के लोकांना, चांगलं बाळसं धरण्याएवढं, भांडवली-व्यवस्था पोसत असतेच. पृथ्वीतलावरुन अजून एक प्रजात अस्तंगत होण्याची शक्यता नजिकच्या भविष्यात निर्माण झालीय. कृत्रिम-बुद्धिमत्तेमुळे (AI) यापैकी किंवा त्यांच्या खालोखाल असणारे PMC (Professional Managerial Class) नावाचे गलेलठ्ठ पगार घेणारे व कामगारांप्रती संवेदनाशून्य असणारे 'डायनॉसोर', जेव्हा 'कॉर्पोरेटीय-कॅनव्हास'वरुन नाहिसे व्हायला लागतील...त्यासमयी, ही टॉपची पाचदहा टक्के लोकं आणि त्यांचा PMC, स्वतःचं अंथरुण पेटल्यावर काय करतो, कसा आक्रोश करतो...ते बघायचंच!

विशेष बाब म्हणजे, वर्ष-१९७६चा नागरी कमाल जमीन धारणा कायदा (ULC ct-१९७६) जरी २००७ मध्ये रद्द करण्यात आला असला; तरीही, मा. न्या. सत्यरंजन धर्माधिकारी, गिरीश कुलकर्णी व गुप्ते यांच्या खंडपीठाने वर्ष-२०१४ मध्ये दिलेल्या निकालानुसार, अशा सर्व जमिनी जप्त करण्याचा यूएलसी (ULC) कायद्याखाली आजही सरकारला अधिकार आहे. त्यानुसार, बंद कापड-गिरण्या व खाजगी उद्योग (उदा. गोदरेज, सिएट, मुकंद, रेमंड, व्होल्टास, क्रॉम्प्टन, नेरोलॅक, NRC इ.)...यांच्या हजारो हेक्टर जमिनी सरकारने परत ताब्यात घेऊन जनहितासाठी (कामगारांना, गरीब व मध्यमवर्गीयांना वर्ष १९७६ ते १९९० पर्यंत 'म्हाडा'ने उपलब्ध केल्याप्रमाणे परवडणारी घरे, सार्वजनिक शाळा व आरोग्यकेंद्रे, बागबगीचे, मैदाने इ. कामांसाठी) वापरणे, अपेक्षित असताना बड्या जमीनधारकांशी हात मिळवणी करुन या निर्णयाविरोधात दिनांक १ ऑगस्ट २०१९ रोजी महाराष्ट्र राज्य सरकारने आदेश काढून (G.R.) केवळ १० टक्के पैसे भरा आणि 'यूएलसी' कायद्याअंतर्गत सूट देऊन, 'जमिनी घशात घाला', असा तद्दन 'बेकायदेशीर' व्यवहार, कंपन्यांच्या हितासाठी व आपल्या मर्जीतील खाजगी बिल्डरांसाठी केलेला आहे. गिरण्याखालची फक्त, एक तृतीयांश जमीन लाखाहून अधिक गिरणी-कामगारांसाठी उपलब्ध करुन देतायत, जेव्हा, संविधानदृष्ट्या संपूर्ण जमीनच जनहितासाठी उपलब्ध केली जायला हवी...त्याबद्दल, चुकूनही या संपादक महोदयांनी आपल्या लोकसत्ता वर्तमानपत्रातून आवाज उठवलाय?

आता, 'गिरीश कुबेर' या असामींच्या, उपरोल्लेखित संपादकीय लेखातील एकेका मुद्द्याचा समाचार घेऊयाच....

म्हणे, या नव्या कामगार-संहितांना रा. स्व. संघप्रणित 'भारतीय मजदूर संघा'चाही विरोध होता; पण, त्यांची भूमिका आता बदलली.... त्यांच्या या प्रतिपादनातच 'संघप्रणित' असा स्पष्ट उल्लेख आल्यावर, पुढे काही बोलण्याची गरज आहे? भांडवली-व्यवस्थेच्या 'बटीक' असलेल्या 'युनियन्स व युनियन-कमिट्या', भारतभर कंपन्या-कारखान्यांतून एवढ्या फोफावलेल्या आहेत की, अगदी काही विचारु नका. हे कामगार-पुढारी नसून, व्यवस्थापनाशी गुन्हेगारी हातमिळवणी करुन कामगारांची सर्रास लूट करणारे कामगार-पेंढारी आहेत! नव्या कामगार-कायद्यांमुळे, या अशा प्रकारांना अजून प्रचंड ऊत येईल; कारण, आता जातिवंत-जाज्वल्य असणाऱ्या 'डाव्यांच्या युनियन्स' संपवणं, भांडवलदारांसाठी अगदी 'हातचा मळ' होईल!

म्हणे, आस्थापनांस कर्मचाऱ्यांचा रोजगार खंडित करण्याचा अधिकार नसेल तर, रोजगार-निर्मिती होणार नाही...आणि, त्याकामी नरेंद्र मोदींनी मोठं धैर्य दाखवलं.... या प्रतिपादनाद्वारे नव्या कामगार-संहितांमागचा, भाजप-संघीयांनी दडवून ठेवलेला खरा 'कामगारघातकी' कुटील हेतू उघड केल्याबद्दल, गिरीश कुबेरांचं मनःपूर्वक अभिनंदन (यातूनही, समस्त कामगारवर्गाला बोध घेता येत नसेल; तर, तर ते स्वतःच्या कर्माने मरतील)! ...स्वतःला 'अर्थतज्ज्ञ' म्हणवणाऱ्या कुबेरांना वर्ष-२००१ मध्ये अर्थशास्त्राचा नोबेल-पुरस्कार मिळवणाऱ्या 'जोसेफ स्टिग्लीट्झ' यांचं, यासंदर्भातील प्रतिपादन व 'शेपॅरो-स्टिग्लीट्झ एफिशन्सी वेज-मॉडेल' (ShapiroStiglitz efficiency wage model) वगैरे माहित नसेल, हे संभवत नाही. याचाच अर्थ, जाणिवपूर्वक भांडवली-व्यवस्थेची 'सुपारी' घेत व आपल्या हातात 'लोकसत्ता' आहे म्हणून त्याचा गैरफायदा घेत, सोयिस्कर लिखाणाचा वेडावाकडा 'सट्टा' लावून टाकायचा आणि वाचकांची दिशाभूल करण्याचं पातक करायचं, असं हे सगळं तर्कट आहे. आपल्या व्यासंगी, अभ्यासू, ज्ञानी वृत्तीचा मोठा आव आणून केली गेलेली, ही जरा वेगळ्या प्रकारची; पण, 'पीत-पत्रकारिता'च (Yellow-Journalism) होय! राहिला सवाल, नरेंद्र मोदी धैर्यवान असण्याचा...वस्तुस्थिती ही आहे की, साधी पत्रकार-परिषद घ्यायला किंवा मणिपुरला जायला घाबरणारा (अशी कैक उदाहरणे आहेत) असा, या माणसाएवढा तद्दन 'भित्रा' पंतप्रधान, भारतानं यापूर्वी कधिही पाहिलेला नाही. शेकडो कमांडोंच्या घोळक्यात कुणाचीही छाती ५६ होईल हो आणि मुख्य म्हणजे, असल्या काही विशेषणाचं शेपूट, मोदींना कुबेरांनी चिकटवल्याचं जर कुणी व्हाईट हाऊसमध्ये जाऊन डोनाल्ड ट्रम्प यांना सांगितलं; तर, ते एकदम 'व्हॉट अ जोक' म्हणत, ...पृष्ठ क्र. ६ वर

# सौ सुनार (गिरीश कुबेर) की, एक लुहार (धर्मराज्य) की....

...पृष्ठ क्र. ५ वरुन

गडगडाटी हास्य करतील!

म्हणे, कमालीच्या गुंतागुंतीच्या शंभरएक (केंद्र व राज्य कायदे मिळून) कामगार-कायद्यांना सुटसुटीत सोपं करत ४ कायदे केले गेलेत व ही गुंतागुंत 'कामगार' विषय, राज्यघटनेच्या सामायिक-सूचीत (Concurrent List) असल्यामुळे झालीय.... रामदास पाध्येंच्या हातातल्या 'अर्धवटराव' या बोलक्या बाहुल्यासारखाच, 'गिरीश कुबेर' हा भांडवलदारांच्या हातातला 'अर्धवटराव' बोलका बाहुला, एकतर यासंदर्भात 'अज्ञानी' आहे किंवा नसल्यास वाचकांपासून जाणिवपूर्वक जगभरातली वस्तुस्थिती लपवून ठेवतोय. ज्या ग्रेट ब्रिटनच्या 'वेस्टमिन्स्टर' प्रणालीवर, आपली 'संसदीय-प्रणाली' बेतलेली आहे; तिथे, आपल्यापेक्षाही अधिक गुंतागुंतीचे व संख्येनं भारी कामगार-कायदे आहेत (नुसत्या राणीचेच ६५ कामगार-कायदे आहेत). ज्या अमेरिकेकडून काही अंशी आपण 'संघराज्यीय-प्रणाली' उसनी घेतलीय, त्या अमेरिकेत देखील केंद्राचा व त्यातील ५० राज्यांचा मिळून कामगार-कायद्यांचा प्रचंड गुंता आहे...केवळ, केंद्रीय (Federal) कामगार-कायद्यांचीच संख्या १८० इतकी आहे आणि त्यात, ५० राज्यांचे, मिळून आपल्या राज्यांसारखेच असलेले स्वतंत्र कामगार-कायदे मिळवले; तर, ती संख्या मारुतीच्या शेपटासारखी वाढून, अजून काही 'शेकड्या'त जाईल...तेव्हा, या कुबेर नावाच्या बुद्धिमान 'खेकड्या'ने कामगारविश्वात बिळं खणण्याचं पापकर्म, आता तरी सोडून द्यावं. पुढारलेल्या पाश्चात्य जगतापैकी कुणालाच या कामगार-कायद्यांच्या संख्येबाबत व गुंत्याबाबत कसलाही अडसर, कसलीही अडचण होत नसताना, ही भारतीय-भांडवलदारांची कोल्हेकुई कशासाठी? ...तेव्हा, हे कायद्यांचं केवळ सुलभीकरण वा एकत्रीकरण नसून, या सगळ्या सव्यापसव्याचा अर्थ एकच आहे; तो म्हणजे, कामगार-कर्मचारीवर्गाला कायमस्वरुपी साफ 'गुलाम' बनवून टाकायचं व त्यांच्या टोकाच्या शोषणातून भांडवलदारांची ओटी भरायची! आणि, त्यातूनच, आपले राजकीय काळे धंदे चालू ठेवायचे. ब्रिटीशांची हुजरेगिरी करणाऱ्या संघीय-प्रवृत्तींना बरोबर माहित्येय की, भारतीयांच्या रक्तात गुलामगिरी, चांगलीच रुजलेली आहे; म्हणूनच तर, आपण १५० वर्षांहून अधिककाळ पारतंत्र्यात होतो.

म्हणे, सद्यस्थितीत 'कामगारहित' म्हणजे, जेमतेम १४ ते १५ टक्केच संघटीत कामगारांचे भले.... अहो कुबेरजी, ही संघटित-टक्केवारीही तुम्ही थोडी फुगवूनच लिहिलीयतं. एकेका कंपनी-कारखान्यात शेकडो नव्हे, हजारोंच्या संख्येनं काम करणाऱ्या कामगारांच्या चिरफळ्या कुणी व कशातून उडवल्या, हे काय तुम्हाला सांगायला हवं? आऊटसोर्सिंग (OutSourcing) नावाच्या 'सैताना'चा, औद्योगिक व सेवा क्षेत्रातला धुमाकूळ, हा 'खाउजा-धोरणा'अंतर्गत आलेल्या 'कंत्राटी-गुलामी'नेच पैदा केला ना? त्यातूनच, कुबेर म्हणतात त्याप्रमाणे, शेकडो-हजारो कामगार असलेल्या बड्या कंपन्यांच्या औद्योगिक छतांऐवजी; कधिही बंद करायला सोयीच्या अशा, १०० पेक्षा कमी म्हणजे, ९९ वा त्याहून कमी संख्येच्या औद्योगिक 'छत्र्या' तयार झाल्या ना? ही बदमाषी कोणाची व त्यासाठी, आजवर कुणाला काय शिक्षा झाली? नव्या कायद्यानुसार, कुबेर म्हणतात तशा ३०० पेक्षा कमी म्हणजे, २९९ पर्यंत कामगार असणाऱ्या मोठ्या कंपन्या, नव्याने तयार होणार आहेत का? तर, त्याचं सरळसोट उत्तर 'नाही' असं असून, उलटपक्षी आहेत त्या मोठ्या कंपन्या...पानपट्टीचे ठेले, हातगाड्या वा कोपऱ्यावरच्या टपऱ्यांसारख्या हव्या तेव्हा, सहजी बंद करता येण्यासाठीच, ही नवी तरतूद वापरली जाणार आहे...ज्यातून, ७०% हून अधिक कामगार-कर्मचारी कधिही बाधित होऊ शकतील. ...बरं ते जाऊ दे, एवढीच या असंघटित-असुरक्षित 'गिग' कामगारांची (Gig-Workers), ज्यांना आम्ही 'पिग' कामगार (Pig-Workers) म्हणतो, त्यांची एवढीच काळजी आहे; तर, त्यांच्यासाठी सन्मानजनक 'किमान-वेतन संरचना' उभ्या करुन (सध्याचं, किमान-वेतन हे, 'बेकार-भत्त्याच्याही लायकीचं नाही) आणि पाश्चात्य देशांप्रमाणे भरभक्कम सामाजिक-सुरक्षितता (Social Security) निर्माण करुन दाखवा. त्यांच्याप्रमाणेच, 'अनुचित कामगार प्रथां'साठी (Unfair Labour Practices) व्यवस्थापकांना ३ वर्षांच्या तुरुंगवासासह फार मोठ्या आर्थिक-दंडासारख्या तरतूदी आणून दाखवा...मुख्य म्हणजे, त्यांची कडक अंमलबजावणी करुन दाखवा. प्रत्यक्षात तर तुम्ही, या नव्या कायद्यांनी, आधीच भ्रष्टाचाराने पोखरल्या गेलेल्या अंमलबजावणी-यंत्रणेच्या जागी 'फॅसिलिटेटर' वगैरे (जबड्यातील दात आणि पंजातील नखाविना वाघासारखे) आणून, अंमलबजावणी साफ मिळमिळीत करुन ठेवलीय...या सगळ्यातून, कामगारांचं सगळं उरलसुरलं संघटित-क्षेत्रही उध्वस्त करुन टाकण्याचा, तुमचा खरा नापाक इरादा, कसा काय नजरेआड होऊ शकेल?

संपादकियात अनवधनाने का होईना, एक दुसरी कबुली दिली जातेय, ती म्हणजे, निश्चलीकरणाच्या (नोटबंदी) 'अल्पमती' निर्णयाने असंघटित कामगार देशोधडीला लागला.... म्हणजेच, नरेंद्र मोदी 'अल्पमती' असल्याची, ही जाहीर कबुलीच सम जायची; फक्त आता, यावेळेस त्यात फरक एवढाच आहे की, 'बहुमती' भांडवली-बुद्धी'ने, हे तद्दन 'कामगारघातकी' स्वरुपाचे नवे कामगार-कायदे आणले गेले आहेत!

म्हणे, कामगार नेते, हे नेते कमी आणि खंडणीखोर अधिक असेच आहेत... असे खंडणीखोर पुढारी, कामगार-कर्मचारीवर्गाला लुबाडण्यासाठी व्यवस्थापनंच निर्माण करत असतात आणि ते बव्हंशी स्थानिक राजकीय-पदाधिकारी, नगरसेवक, आमदार किंवा खासदार असतात (हा उपद्रव महाराष्ट्रात नवी मुंबई, रायगड-तळोजा, पिंपरी-चिंचवड, पुणे, नगर, ठाणे-अंबरनाथ येथे फारच वाढलाय)...लक्षात घ्या की, हे खंडणीखोर पुढारी व्यवस्थापकांच्या/मालकांच्या सोयीचे असतात. ते भांडवलदारांकडून नित्यनेमाने गोळा करत असलेल्या करोडोंच्या 'मनी पॉवर'मधूनच स्वतःची एक 'मसल-पॉवर'च उभी करतात. त्यातूनच, औद्योगिक-पट्ट्यातील सगळ्या कामगार-कर्मचारीवर्गावर आपली प्रचंड 'दहशत' ते ठेऊन असतात; जेणेकरुन, आपल्यावरील शोषण-अन्यायाविरुद्ध कामगार दाद मागणं तर सोडाच, साधी एखादी प्रामाणिक डावी-युनियन करण्याची देखील हिंमत करु शकू नये. आणि, वादासाठी समजा, ते 'खंडणीखोर' युनियन-पुढारी, कंपन्यांच्या गैरसोयीचे असतीलच; तर, कंपन्यांच्या दिमतीला असणारे खाजगी बाऊन्सर्स (थोडक्यात, भाडोत्री गुंड) आणि कामगारांच्या 'घामाचा दाम' (Surplus Value), वरच्यावरच लुटणारे लाचार-लुच्चे व भ्रष्ट पोलिस आणि कामगार-खात्यातील अधिकारी... ही सगळी मंडळी मिळून, त्यांना शिल्लक तरी ठेवतील? ...कुबेरांच्या 'लोकसत्ता'मध्ये एखादी जातिवंत डावी युनियन त्यांनी कधि होऊ दिलीय का? तेव्हा, हा कुबेर नावाचा बुद्धिमान (मनुष्य)प्राणी, स्वतः काचेच्या घरात रहात असूनही, डाव्यांच्या दगडी घरांवर दगड मारु पहातोय! आमचं गिरीश कुबेरांनाच काय, इतर सगळ्यांनाच जाहीर आव्हान आहे की, असे 'खंडणीखोर' कामगार-पुढारी, तुम्ही कायद्यासमोर आणून त्यांना कडक शासन द्याच; त्यात एखादा जरी डाव्या चळवळीतला पुढारी आढळतो का ते बघाच; असले पुढारी कधि 'डावे' नसतातच आणि चुकूनमाकून 'डाव्या-चळवळी' मध्ये त्यांनी शिरकाव करुन घेतला असलाच; तरी, त्यांची 'खंडणीखोर-वृत्ती', ही खरंतरं उजव्यांसारखी ब्लॅकमेलिंगमधून इलेक्टोरल-बॉण्ड्स, PMCare फंड गोळा करणारी असते!

नव्या काळ्या कामगार-संहितांमुळे 'हायर अँड फायर'चं संकट 'दत्त म्हणत' थडकल्याने...शीर्षकातच तळपत्या तलवारीचे म्यान, असं विडंबनाने म्हणण्याचं दुःसाहस करणारं हे संपादकीय, वरकरणी लेखाच्या खालच्या भागात सुर्वेंचं कौतुक केल्याचं दर्शवतं; पण, खरंतरं अत्यंत बुद्धीकौशल्याने ते त्यांची बदनामीच करतंय...ही गोष्ट, कामगारांच्या साधारण बुद्धीलाही समजावी. या विकृत भांडवली-प्रवृत्तींनी तेव्हाही, श्रमिकांचं शोषण रोखणाऱ्या कार्ल मार्क्सला काय किंवा नारायण सुर्वेंना काय...कायमच कडवा विरोध केला होता. त्यांचा त्यांना विलक्षण तिटकारा पूर्वीही होता व आजही तो कायम आहे. पण, आता मार्क्स आणि सुर्वे भूतकाळात गडप झालेले असल्याने, त्या होऊन गेलेल्या काळापुरतं 'बिनकामा'चं निरर्थक कौतुक करुन दाखवण्याचा शहाजोगपणा, हे संपादकीय करतंय. डाव्यांचे मागासलेपण पुढारलेले असते, म्हणणाऱ्या कुबेरी-प्रवृत्तींचं, अशा 'डँबिस'पणातलं संपादकीय-कौशल्य, फारच प्रगत व पुढारलेलं असतं.

या संपादकियाने खुबीने दडवून ठेवलेली व या '४ काळ्या कामगार-संहितां'मुळे (Black Labour-Codes) कामगारविश्वावर कोसळणारी संकटं आणि निर्माण होणारे उत्पात, या संबंधाने काही प्रमुख बाबी जरा पडताळून बघूयाच....

१) कायम नोकऱ्या, आता कायमच्या संपणार; म्हणजे, लग्न करुन संसार थाटणं, ही एक 'लक्झरी'च बनणार.

२) कायम नोकऱ्यांसोबतच 'कामगार-चळवळ' हळूहळू संपणार...त्यातून संपासारखे संघर्ष, अगदी 'अपवाद' म्हणूनच क्वचित कधि यशस्वी होणार.

३) मुँह में राम, बगल में छुरी, या भाजपाई कुटीलनीतिनुसार 'गिग-वर्क्स' (Gig-Workers) आदी गोंडस संज्ञा वापरत...वैयक्तिक-करारांच्या कारस्थानांतून व 'हायर अँड फायर' धोरणातून वगैरे, ही भांडवली व्यवस्था, प्रत्यक्षात सगळ्याच कामगारांना 'पिग-वर्क्स' (Pig-Workers) बनवणार....कुबेरांचं कार्यक्षेत्र असलेल्या प्रसारमाध्यमातील कर्मचाऱ्यांसाठी (पत्रकार व बिगर पत्रकार) असलेल्या 'मजिठीया आयोगा'सारख्या (वर्ष-२००७) तरतुदी/शिफारशी या कर्मचाऱ्यांनीच ...पृष्ठ क्र. ७ वर

# नव-बेबंदशाही!



**अलीकडे मोदी काळात होत असलेला भ्रष्टाचार हा, पूर्वीच्या मनमोहन काळातील भ्रष्टाचारापेक्षा बराच प्रगत, लवचिक आणि निब्बर कातडीचा आहे, कसा ते समजून घेण्यासाठी खालील उदाहरणे पाहा...**

पूर्वी एखाद्या नेत्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होत असत; तेव्हा, त्याचा राजीनामा मागण्याची चर्चा होत असे. प्रत्येकवेळी राजीनामा दिला जात होता असं नाही; पण, बऱ्याचदा घोटाळ्याची चर्चा शिगेला पोहोचून राजीनामा द्यायला भाग पडण्याची प्रकरणे घडत असत.

आता केंद्रीय मंत्र्यांच्या इथेनॉल सक्तीच्या धोरणाने, मंत्र्यांच्या मुलाच्या कंपनीला थेट फायदा होत आहे, हे लोकांसमोर उघड होऊनही ते मंत्री राजीनामा देतील अशी आशा खुद्द विरोधकांनाही वाटायची बंद झाली आहे, तेही अगदी जेमतेम विरोध करुन बाजूला होतात. त्यावर कडी म्हणजे, ते केंद्रीय मंत्री आपल्यावर आरोप होणे हे राष्ट्रद्रोही षडयंत्र वगैरे आहे म्हणून सांगतात. आपण कसे शेकडो कोटी कमवू शकणारे टॉप ब्रेन आहोत, याची बिनदिक्कत फुशारकी मारतात.

दुसरे केंद्रीय मंत्री एका धर्मादाय संस्थेच्या मालमत्तेविषयी गोत्यात येतात. ती डील रद्द करुन विषय मिटला असं म्हणून, आरोप करणारे आणि आरोपी दोघेही शांत होतात. राजीनामा, फौजदारी कारवाई वगैरे होण्याची आशा आणि इच्छा खुद्द आरोप करणाऱ्यांनाच नसते!

आपल्या मुलाच्या उघडउघड बेकायदेशीर मालमत्ता व्यवहाराची चौकशी होताना दिसल्यावर, उपमुख्यमंत्री बिनधास्त सांगून टाकतात की, त्यांचा त्यांच्या मुलाच्या आर्थिक व्यवहारांशी काही संबंधच नाही. राजीनामा मागणे सोडाच, साधी जबाबदारी घेणेही आता गरजेचे राहिलेले नाही.

हे असं का झालं? त्याचं कारण म्हणजे, देशासाठी/धर्मासाठी एवढं सहन कराच अशा प्रकारचं एक 'परमिशन स्ट्रक्चर' तयार केलं गेलं, ज्याद्वारे कोणताही गैरव्यवहार, दुर्वर्तन आणि गुन्ह्यावर पांघरुण घालता येईल. यामुळे राष्ट्रवादाची किंवा धर्मवादाची किंवा काही ठिकाणी जातीची शाल ओढून, आपले घोटाळे बिनदिक्कत झाकणे ही वृत्ती एकप्रकारे समाजमान्य होऊन बसली.

ज्यांच्यावर आपण स्वतःच भ्रष्टाचाराचे टोकाचे आरोप केले, खटले घातले, त्यांच्याशी सत्तेसाठी एका भल्या पहाटे गळ्यात गळ्यात घालताना, आता नेत्यांना काही वाटेनासं झालं आहे. त्याच्यामागे हे 'परमिशन स्ट्रक्चर' आहे. नेत्यांना पक्का विश्वास आहे की, त्यांचे समर्थक किंवा एकूणच मतदार देशासाठी किंवा धर्मासाठी हेही सहन करतीलच!

राजकारणात राष्ट्रवाद, धर्म किंवा जाती यांचं स्तोम माजवण्याचे बरेच तोटे आहेत; पण, त्यातील सर्वात मोठा आणि गंभीर परिणाम म्हणजे, हे असं 'परमिशन स्ट्रक्चर' तयार होणे. सत्तेत असलेल्या किंवा एकंदरच राजकीय जीवनात असलेल्या कोणालाही आता घोटाळे, गुन्हे आणि दुर्वर्तन करुन, बिनदिक्कत तोऱ्यात वागायची एक प्रकारची सामाजिक परवानगी, आपण जनता म्हणून देऊन बसलो आहोत. देशप्रेमाच्या धर्माच्या किंवा जातीच्या नांवावर आपण चालवून घेतलेली ही सुलभ परवानगी व्यवस्था म्हणजे, 'परमिशन स्ट्रक्चर' आता आपल्या छाताडावर, या अशा बेबंद भ्रष्टाचाराच्या स्वरुपात थयथया नाचत आहे!!

*....मकरंद देसाई*

## ठाण्यात कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कवितांचा 'जागर' संपन्न!

...पृष्ठ क्र. ३ वरुन

कामगार-नेते राजन राजे यांनी, नारायण सुर्वेंच्या काव्यलेखन शैलीची तुलना जगविख्यात आंग्ल कवी 'रॉबर्ट फ्रॉस्ट'शी केली जाते...तशीचं संभाषणात्मक, अगदी बोलीभाषेसारखी शैली; पण, थेट भस्सकन आत जाऊन हृदयाचा ठाव घेणारी, कुणाच्या कुठल्या पूर्वपरवानगीविनाच अंतःकरणाला सरळ भिडणारी... म्हणून, मला वाटतं, तेव्हा जर आजच्या सारखं फडणविशी ट्रिपल-इंजिन सरकार महाराष्ट्रात असतं; तर, ते 'पद्मश्री' वगैरे नागरी-सन्मान मिळणं सोडाच; उलट 'शहरी नक्षलवादी किंवा अर्बन नक्सलाईट'च्या यादीत त्यांचं नाव समाविष्ट झालं असतं, अशापद्धतीने आपल्या भावना अधिक परखडपणे व्यक्त केल्या.

शेकडो वर्षे गुलामगिरीत खितपत पडलेला कष्टकरी-बहुजनवर्ग नारायण सुर्वे यांनी आपल्या लिखाणातून जागृत केला. प्रस्थापित व्यवस्थेवर आसूड ओढत, त्यांनी मार्क्सवादाची व्यवहार्य मांडणी केली. कालच २१ नोव्हेंबरला केंद्र सरकारने 'काळी कामगार संहिता' देशभर लागू केलीय आणि आज आपण 'कामगार-कवी' असलेल्या नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त एकत्र आलोय. खरी म्हणजे हीच वेळ आहे की, आपण सर्वांनी एकत्र येत, या कामगारद्रोही कायद्याचा निषेध तर केलाच पाहिजे, त्याचबरोबर या फॅसिस्ट-शक्तींविरोधात आंदोलनांच्या माध्यमातून लोकशाही आणि सनदशीरमार्गाने रस्त्यावरची लढाई लढली पाहिजे, असं कॉ. उदय चौधरी यांनी विचार मांडले.

दरम्यान, या कवी-संमेलनाच्या निमित्ताने आपल्या कविता सादर करताना, कवी अरुण म्हात्रे आणि कवियित्री प्रज्ञा दया पवार यांनी, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' या कामगार संघटनेने हुतात्मा स्मारकाच्या प्रतिकृतीला अभिवादन करण्याचा व नारायण सुर्वे यांची जन्मशताब्दी साजरी करण्याचा, जो काही उपक्रम केला, त्याचं जाहीर कौतुक करुन, ही अभिमानाची बाब असल्याचं ठळकपणे नमूद केलं. आम्ही स्वतःला भाग्यवान समजतो, कारण नारायण सुर्वे होते म्हणून आम्ही सर्व आहोत. आज त्यांचंच स्मरण करण्यासाठी आम्ही इथे जमलेलो आहोत, नारायण सुर्वे हे, नव्या युगाची नवी पहाट आहेत, अशा भावना कवी अरुण म्हात्रे यांनी यावेळी व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. नाना अहिरे यांनी केले तर, कार्यक्रमाचे प्रस्तावित 'लाल बावटा निशाण पक्षा'चे ठाणे कार्याध्यक्ष उदय चौधरी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कॉ. अविनाश कदम यांनी डाव्या चळवळीचे क्रांतिगीत गाऊन केली.

# सौ सुनार (गिरीश कुबेर) की, एक लुहार (धर्मराज्य) की....

...पृष्ठ क्र. ६ वरुन

नाकाराव्यात म्हणून प्रारंभी, काही निवडक कर्मचाऱ्यांना चांगल्या पगारवाढीची 'लालूच' दाखवली गेली व ते हळूहळू सगळेच, त्या आमिषाला व दडपणाला बळी पडले...पण, या भांडवली-हत्तीचे खरे दात नंतरच पुढे दिसायचे होते, ते दिसायला लागले; त्यामुळे, आता बहुसंख्य कर्मचारी खूपच पस्तावतायत.

४) 'कंत्राटी-कामगार पद्धती'विरुद्ध लढण्याचे कायदेशीर वा न्यायालयीन मार्ग, आता जवळपास पूर्ण बंद होणार.

५) ७०% कामगार-कर्मचारीवर्गाच्या संदर्भात ले-ऑफ (कामबंदी), कामगार-कपात आणि कंपनी बंद केली जाणं...पानटपरी बंद करण्यासारखं, अगदीच सुलभ होणार.

५) अन्य देशात कंपन्यांच्या तात्कालिक बाजारपेठीय अडचणी दूर करण्यासाठी 'कंत्राटी-कामगार पद्धत' वापरतात; म्हणूनच, तिथे कायम-कामगारांएवढं तर सोडाच; त्यांच्याही पेक्षा काही पटीत (कधि कधि अडीच पट-तिप्पट) वेतन त्यांना दिलं जातं. आपल्याकडे मात्र, ती 'कंत्राटी-पद्धत' सर्रास फक्त, पिळवणूक आणि पिळवणूकच करण्यासाठी वापरली जाते. 'हायर अँड फायर', हे धोरणदेखील, प्रामुख्याने तेवढ्यासाठीच वापरणार, अधिकच्या 'रोजगार-निर्मिती'साठी मुळीच नव्हे!

खरंतरं, असं फसवं व कामगार-जगताची हकनाक बदनामी करणारं, प्रक्षोभक 'संपादकीय' लिहिल्याबद्दल, लोकसत्तेच्या वा 'एक्स्प्रेस'च्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ हरताळ करायला हवा होता; पण, १९९१च्या 'खाउजा-धोरणा'अंतर्गत आलेल्या 'कंत्राटी-गुलामी'नं सगळ्या कामगारविश्वाचाच पाठकणा मोडलाय; त्यामुळे ना लोकसत्तेचे, ना इतर कुठले कामगार...असा काही निषेध व्यक्त करण्याची हिंमत दाखवणार. थोडक्यात, काँग्रेसच्या मनमोहनसिंग सरकारने आणलेली कामगारांची 'कंत्राटी-गुलामी' कमी पडतेय की काय; म्हणून, अटलबिहारी बाजपेयींच्या पाऊलावर पाऊल ठेवत नरेंद्र मोदी सरकारने '४ काळ्या कामगार-संहिता' (Black Labour-Codes), कामगारांवर व कामगार-चळवळीवर अन्यायकारकरित्या लादलेल्या आहेत...असो, वाचकांना विनम्र अभिवादन व धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# संयुक्त महाराष्ट्र राज्य हुतात्मा स्मृतीदिनानिमित्त,
# प्रा. नामदेवराव जाधव यांची 'धर्मराज्य पक्ष' कार्यालयास सदिच्छा भेट





राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे थेट चौदावे वंशज तसेच, 'सनय छत्रपती शासन पक्षा'चे संस्थापक/अध्यक्ष प्रा. नामदेवराव जाधव यांनी, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगार-नेते मा. राजन राजे यांची, दि. २१ नोव्हेंबर-२०२५ रोजी, 'धर्मराज्य पक्षा'च्या ठाणे कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. यावेळी मा. राजन राजे यांनी, प्रा. नामदेवराव जाधव यांचे, शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. उल्लेखनीय बाब म्हणजे, संयुक्त महाराष्ट्र राज्य हुतात्मा स्मृतीदिनानिमित्त, 'धर्मराज्य पक्षा'च्या कार्यालयातील हुतात्मा स्मारकाच्या प्रतिकृतीला मा. राजन राजे व प्रा. नामदेवराव जाधव यांनी पुष्पहार अर्पण करुन, अभिवादन केले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात, मोराराजी देसाई या मराठीद्वेष्ट्या-महाराष्ट्रद्रोही नरराक्षसाने दि. २१ नोव्हेंबर-१९५६ रोजी, फ्लोरा-फाउंटन (आताचा हुतात्मा चौक) येथे केलेल्या अमानुष गोळीबारात मृत्यूमुखी पडलेल्या, १०६ हुतात्म्यांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दरम्यान, या भेटीत सद्य राजकीय परिस्थिती व मराठी तरुणांच्या सामाजिक प्रश्नांवर दोघांमध्ये सखोल चर्चा झाली. कंत्राटी-कामगारपद्धतीमुळे मराठी तरुण गुलामगिरीत ढकलला गेलेला असून, प्रस्थापित राजकारणी आणि भांडवलशाही व्यवस्थेने, महाराष्ट्राचा मूळ भूमिपुत्र उध्वस्त केला असल्याचे रोखठोक प्रतिपादन मा. राजन राजे यांनी यावेळी केले. यादरम्यान, प्रा. नामदेवराव जाधव यांनी, मा. राजन राजे यांची एक दुकान, एक मकान ही संकल्पना उचलून धरत, आपल्या पक्षाच्या माध्यमातून आपणही यासंदर्भात लोकशाहीमार्गाने चळवळ उभी करु, असे आश्वस्त केले. 'धर्मराज्य पक्ष' आणि 'सनय छत्रपती शासन पक्ष' या दोन्ही पक्षांची विचारसरणी ही, मराठी माणसाच्या अस्तित्वाशी निगडित असल्याने, भविष्यात 'मराठी-माणूस' व 'महाराष्ट्रधर्मा'साठी आपण नक्कीच एकत्र येऊ, असे आवाहन प्रा. नामदेवराव जाधव यांनी करताच, जोपर्यंत तुमच्या हातून सत्कर्म घडतंय, तोपर्यंत आम्ही तुमच्या सोबत असू... कारण, मी व्यक्तीच्या नव्हे; तर, प्रवृत्तीच्या प्रेमात पडणारा माणूस आहे! अशी आपली थेट भूमिका मा. राजन राजे यांनी स्पष्टपणे बोलून दाखवली. याप्रसंगी प्रा. नामदेवराव जाधव यांनी लिहिलेली, 'शिवाजी द मॅनेजमेंट गुरु (भाग-२)', 'जिजाऊ द मदर ऑफ ऑल गुरुज' आणि 'सनय' ही तीन पुस्तके, मा. राजन राजे यांना सप्रेम भेट दिली. या सदिच्छा भेटीवेळी 'धर्मराज्य पक्षा'चे सचिव श्री. नरेंद्र पंडित, प्रवक्ते श्री. समीर चव्हाण, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर आदी पदाधिकारी उपस्थित होते.







'कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय' आणि 'झेंडा सामाजिक संस्था' यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सव-२०२५ या कार्यक्रमाचे सालाबादप्रमाणे याहीवर्षी, दि. २३ नोव्हेंबर-२०२५ रोजी, कामोठे (ता. पनवेल) येथे मोठ्या जल्लोषात आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला 'धर्मराज्य पक्षा'चे संस्थापक अध्यक्ष तसेच, ज्येष्ठ कामगार-नेते मा. राजन राजे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित जनसमुदायला संबोधित करताना मा. राजन राजे यांनी, आगरी-कोळी-कराडी समाज हा, मुंबई आणि नवी मुंबईसह, संपूर्ण रायगड जिल्ह्याचा मूळ रहिवाशी असून, फक्त आपल्या जिल्ह्याचेच नव्हे; तर, संपूर्ण महाराष्ट्राच्या अस्मितेचे व मराठी-भूमिपुत्रांचे रक्षण करण्याची तुमच्यावर आहे. 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'च्या माध्यमातून आम्ही रक्तपिपासू शोषक-व्यवस्था (Vampire State System) असलेल्या, धनदांडग्या भांडवलदारांविरोधात अविरत संघर्ष करीत आहोतच... तुम्हीही 'भूमिपुत्र' म्हणून सावध राहिलेच पाहिजे! अशा शब्दांत आवाहन करुन, या आगरी-कराडी महोत्सवाच्या, १४व्या वर्षानिमित्त आयोजित केलेल्या सांस्कृतिक-सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. महोत्सवाच्या या कार्यक्रमाला, 'धर्मराज्य पक्षा'चे प्रवक्ते श्री. समीर चव्हाण, पक्षाचे माहिती अधिकार ठाणे कक्षप्रमुख श्री. अनिल महाडिक, 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'स्थानिक भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त रिक्षाचालक-मालक संघटने'चे श्री. महेंद्र म्हात्रे, श्री. राजू म्हात्रे, श्री. आत्माराम म्हसकर, श्री. सदाभाऊ भोईर आणि 'धर्मराज्य पक्षा'चे पनवेल तालुका अध्यक्ष श्री. गोपीनाथ भगत आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

## दिल्लीतील भीषण स्फोट...डझनावरी बळी!



आता तत्पूर्वीच्या घटनाक्रमाची तर्कसंगत मांडणी करुन पाहूया....

- बिहारच्या विधानसभा-निवडणुकीवर 'गुजराथी-लॉबी'चा, दिल्लीतला खुंटा बळकट होणं वा उखडला जाणं अवलंबून असल्याची जनमानसात चर्चा....

- बिहारच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाची लक्षणीय वाढलेली टक्केवारी, 'बीजेपी NDA आघाडीचं पतन मतपेटीत जवळपास बंद करुन ठेवतं....

- बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्यातील अत्यंत महत्त्वपूर्ण मतदान....

- पहेलगाम हल्ल्यातील अतिरेक्यांचा शोध अजून संपलेला नाहीच (मधल्या काळात, कोणाला तरी 'गिऱ्हाईक' बनवून, त्या अतिरेक्यांना पकडल्या गेल्याच्या दाव्याची समाजमाध्यमातून एकच चर्चा)....

- दिवंगत जम्मू-काश्मीरचे राज्यपाल सत्यपाल मलिक, यांच्या 'पुलवामा' हत्याकांडाबाबतच्या 'सत्यकथना'चं, जनतेला या निमित्ताने पुन्हा ओघानेच स्मरण होणं....

- काश्मीरच्या पहेलगाम हल्ल्यात 'धर्मा'ची पृच्छा करत गोळ्या झाडल्याची वदंता; तर, दिल्ली-स्फोटातील मूळ कार-मालक मुस्लिम असल्याचा दावा....

(कोणी कसे, कुठले निष्कर्ष काढायचे; ते आपण सुजाण जनतेवरच सोपवूया आणि विषय संपवूया....)

...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# ज्वालामुखी धगधगतो आहे....

***'लोकसत्ते'चे बनावट व प्रक्षोभक संपादकीय, कामगारांनी प्रतिकात्मकरित्या ठाण्यात गोखले रस्त्यावरील 'लोकसत्ता' कार्यालयासमोरच जाळले..***

कामगारविश्वावर '४ काळ्या कामगार-संहितां'चा बुलडोझर फिरवणाऱ्या भाजप-संघीय NDA सरकारचा आणि गिरीश कुबेरांसारख्या, प्रसारमाध्यमातील त्यांच्या मेंदूविक्या 'बोलक्या बाहुल्यां'चा...'धर्मराज्य पक्षा'तर्फे व कामगारवर्गाकडून ठाण्यात तीव्र निषेध!

----------------------------




सोमवार, दि. २४ नोव्हेंबर-२०२५च्या लोकसत्ता-'संपादकीय लेखाला जाणिवपूर्वक तळपत्या तलवारीचे म्यान, असं शीर्षक देत, पद्मश्री कामगार-कवी कै. नारायण सुर्वे यांचा, आपल्या बुद्धीकौशल्याने 'अवमान' करणाऱ्या आणि त्या लेखातून कामगार नेते, हे नेते कमी आणि खंडणीखोर अधिक असेच आहेत, असं समस्त 'कामगार-चळवळी'बाबत अपप्रचार करणारं, अत्यंत बेजबाबदार व संतापजनक वक्तव्य करणाऱ्या 'भांडवली-दलाल' गिरीश कुबेर यांचा कामगारांकडून लोकसत्तेचे अंक जाळून तीव्र निषेध करण्यात आला!

...तत्पूर्वी, लोकसत्तेसारख्या वृत्तपत्रीय 'गोदी-मिडीया'ने, 'अस्पृश्य' मानलेले...धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष व महाराष्ट्रभरातील संपूर्ण कामगारविश्वात ज्यांचं नाव दीर्घकाळ दुमदुमतंय, असे झुंजार कामगार नेते 'राजन राजे' यांनी, 'लोकसत्ते'च्या हिणकस संपादकियावर संतप्त प्रतिक्रिया नोंदवणारा, एक खरमरीत लेख समाजमाध्यमातून प्रसारीत करत, पत्रकार-जगतातील या दलाली-ढोंगी प्रवृत्तीचा जाहीर निषेध केला होता, ज्याला सगळ्या कामगार जगतातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला! त्यातच, कामगारविश्वातील संतप्त भावनेला सनदशीर मोकळी वाट करुन देणारा, लोकसत्ता-संपादकीय-दहनाचा जाहिर कार्यक्रम ठाण्यात काल, दि. २५ नोव्हेंबर-२०२५ रोजी सायंकाळी पार पडला.

राजन राजे यांच्या खांद्याला खांदा लावून सदर निषेधाच्या कार्यक्रमात...कॉंग्रेसच्या अर्थविभागाचे प्रमुख व नेते विश्वास उटगी, समतेच्या चळवळीतील एक अग्रणी ड. नाना अहिरे, आंबेडकरी चळवळीतील जाज्वल्य विचारवंत-कार्यकर्ते आनंदा ओव्हाळ व धर्मराज्य पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे सचिव समीर चव्हाण व पदाधिकारी सचिन शेट्टी; तसेच, विविध कंपन्यांतील कामगारांनी हिरिरीने सहभाग घेतला.

तळागाळातील जनतेला कायम लुबाडणाऱ्या व श्रमिकांच्या रक्तघामाचं 'वरकड-मूल्य' ओरपणाऱ्या भांडवलशाहीचे निर्लज्ज समर्थन करत भांडवलदारांच्या चरणांवर आपला मेंदू अर्पण करणाऱ्या व त्या व्यवस्थेचे मोठे 'लाभार्थी' असणाऱ्या गिरीश कुबेरांना...खुशाल, राष्ट्रीय संपत्तीच्या निर्मात्याची तळपती तलवार 'म्यान' होण्याची स्वप्न पडू द्यात; पण, टोकाच्या अन्याय-अत्याचार-शोषणाने कामगारविश्वातला ज्वालामुखी आतून धगधगतो आहे आणि तो कुठल्याही क्षणी प्रस्फुटीत होण्याचा देशाला मोठा धोका आहे, असा इशारा देत...राजन राजे यांनी तासाभराच्या आपल्या तडफदार भाषणातून, गिरीश कुबेर बनावट अग्रलेख लिहिल्याबद्दल यांच्यावर अतिशय जळजळीत शब्दात टीका केली. शिवाय, भाषणातून आपल्या भांडवली-हितसंबंधांची जपणूक करणाऱ्या व 'संपादकीय-हक्का'चा सर्रास गैरवापर करत जनतेची फसवणूक, दिशाभूल करणाऱ्या 'कुबेरी-प्रवृत्ती'चा मुखवटाही टराटरा फाडला.




ते पुढे म्हणाले की, ४ काळ्या कामगार-संहितांद्वारे कायम नोकऱ्या संपवण्यातून, कामगार-चळवळ साफ कमकुवत करण्यातून...सगळ्या कामगार-कर्मचारीवर्गावर 'गुलामगिरी' लादण्याच्या भाजप-संघीय सरकारी-धोरणाचं, 'आता नव्या कायद्यांतून कामगारांचं चांगभलं होणार', असं बनावट-विसंवादी 'कुबेरी' समर्थन म्हणजे, 'दहशत-जबरदस्तीने बलात्काराला सामोरं जावं लागणाऱ्या स्त्री संदर्भात, बलात्कार 'एन्जॉय' करण्याची संधीच तिला उपलब्ध होतेय', असं म्हणण्यासारखं, ते एक भयंकर गुन्हेगारी-प्रतिपादन आहे. गिरीश कुबेर, जर कामगार नेत्यांना खंडणीखोर' म्हणत असतील; तर, त्यांना आव्हान आहे की, अशांना त्यांनी कायद्यासमोर आणून त्यांना कडक शासन करावच; त्यात एखादा जरी डाव्या चळवळीतला पुढारी आढळतो, का ते बघावंच!

राजन राजे यांनी आपल्या शब्दांच्या अंगारातून लोकभावनेला प्रकट करताना ज्या लोकसत्तेतून नारायण सुर्वेंचा अवमान करण्यात आला, त्याच्या संपादक कुबेरांसह, अवघ्या भांडवल-व्यवस्थेला...पुन्हा एकवार नारायण सुर्वेंचा जाणिवपूर्वक ज्वलंत परिचय व जागर करुन देताना म्हटलं, कुसुमाग्रज प्रतिष्ठानातर्फे २००४ साली नारायण सुर्वे ना 'जनस्थान-पुरस्कार' देताना त्यांच्या गौरवार्थ निवेदकाने जी प्रदीर्घ कविता म्हटली होती, त्यातील चार ओळी आठवतात...आणि, आठवतात ते नारायण सुर्वेंचे पाण्यात बुडून गेलेले डोळे!

'आठवतं का रे तुला नारायणा, याच हमरस्त्यावर वाळत घातली होतीस तू स्वतःची आतडी कितीकदा...आणि, हिशोब केला होतास, एवढी आतडी पुरतील ...पृष्ठ क्र. १० वर

## ज्वालामुखी धगधगतो आहे.... ...पृष्ठ क्र. ९ वरुन

का, हे जग करकचून बांधायला आणि एकदा बांधल्यावर ते बदलायला'... असा हा, 'Poet of the Proletariat' कुठे आणि गिरीश कुबेर नावाचा भांडवली–व्यवस्थेच्या हातातला मिठू मिठू बोलणारा 'पोपट' कुठे? अनैतिकरित्या गलेलठ्ठ पगार घेत, भांडवली–व्यवस्थेचे लाभ 'स्वांतसुखाय' ओरपणारे, गिरीश कुबेर हे एक भांडवली–दलाल; तर, नारायण सुर्वे म्हणजे, कार्ल मार्क्सच्याच पावलावर पाऊल ठेऊन उन्हापावसात तडफडत, वणवण करत शोषितांचं जग बदलायला निघालेला अवलिया! कविवर्य नारायण सुर्वे यांचे महाराष्ट्राच्या कामगार–चळवळीवर थोर उपकार आहेत... आम्ही ४०–४५ वर्षांपूर्वी त्यांच्याच 'भाकरीचा चंद्र', 'कामगार, एक तळपती तलवार' वगैरे कविता, बॅनरवर छापून कामगार–चळवळीची मुहूर्तमेढ रोवली होती.

भाषणाच्या ओघात राजन राजे पुढे गरजले, आपला 'EVM–जादुगरी'मधून निवडून आलेला पंतप्रधान, आईबापाशी असलेला आपला जैविक–संबंध नाकारतो आणि स्वतःला 'नॉन–बायॉलॉजिकल' घोषित करतो; तर, तिथे मुंबईच्या गिरणगावात कुणी जैविक–आईबापच पोटच्या पोराला नाकारतात आणि एका गिरणीसमोरच्या कचराकुंडीत फेकून देतात... असं ते 'अनाथ' पोरं, गंगाराम व काशीबाई नावाचं सुर्वे–दाम्पत्य

'सनाथ' बनवून वाढवतात; पुढे हाच 'नारायण', कामगार म्हणून 'आत्मभान' जागृत झाल्यावर, एखादा मातीचा घडा फुटावा आणि आतला अंधार मोकळा व्हावा, 'अवघा प्रकाशू व्हावा'... तसा त्या प्रकाशात भूतकाळाविषयी कुठलाही आकस न बाळगता, कुठलीही तक्रार न करता; आपला भवताल 'लाल बावटे की जय' म्हणत, चळवळ आणि साहित्याच्या माध्यमातून बदलायला बाहेर पडतो... जसं अमेरिकेतल्या नवनिर्वाचित डेमोक्रॅटिक–सोशॅलिस्ट महापौर जोहरान ममदानींसाठी एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून युजिन डेब्ज आणि वर्ष–२०१५ पासून बर्नी सँडर्स, 'डेमॉक्रसी ट वर्क'चे रिचर्ड वोल्फ, अलेक्झांड्रा ओकॅसिओ कॉर्टेझ (OC) आणि त्यांचा पुरोगामी विचारसरणीचा U.S. House of Representatives मधला सोशालिस्ट–डेमोक्रॅटिक विचारसरणीचा ढहश डीरिंवहा गट वगैरेंनी, पार्श्वभूमी तयार करुन ठेवली होती; तशीच, वामनराव दादा कर्डक, शाही अमर शेख, अण्णाभाऊ साठे यांच्याकरवी नारायण सुर्वेसाठी तयार करुन ठेवली होती; असं म्हटलं तर वावगं ठरु नये...पण, सुर्व्यांचा नारायण, त्यापलिकडे निघून गेला... त्यांच्या काव्यलेखन–शैलीची तुलना जगविख्यात आंग्ल कवी 'रॉबर्ट फ्रॉस्ट'शी केली जाते. तशीचं संभाषणात्मक, अगदी बोलीभाषेसारखी शैली; पण, थेट भस्सकन आत जाऊन हृदयाचा ठाव घेणारी, कुणाच्या कुठल्या पूर्वपरवानगीविनाच अंतःकरणाला सरळ भिडणारी...म्हणून, मला वाटतं, तेव्हा जर आजच्या सारखं एकनाथ शिंदे, अजित पवार मिळून 'फडणविशी ट्रिपल–इंजिन' सरकार महाराष्ट्रात आणि मोदी–शाहांचं रासवट सरकार दिल्लीत असतं; तर, ते 'पद्मश्री' वगैरे नागरी–सन्मान मिळणं सोडाच; उलट सरकार–दप्तरी नारायण सुर्वेचं नाव, 'शहरी नक्षलवादी' किंवा 'अर्बन नक्सलाईट' म्हणून समाविष्ट झालं असतं. तुकारामांच्या गाथेसारखी ग्रामीण रांगडी काव्यभाषा...तळागाळातील जगण्यातल्या व्यथा–वेदनांचा वेध घेणारी; म्हणून, त्यांचं काव्य तुकारामांच्या गाथेसारखंच अक्षय/अक्षर काव्य ठरलं... म्हणूनच असेल कदाचित, एके प्रसंगी बोलताना, लक्ष लक्ष मराठमोळ्या मनांमध्ये 'सांस्कृतिक–पूल' बांधणारे, महाराष्ट्राचे लाडके साहित्यिक पु. ल. देशपांडे म्हणाले होते, 'अरे, केशवसुत कशाला इकडेतिकडे शोधताय? तुमचा केशवसुत, तिकडे परळमध्ये राहतोय!'

इस्लामिक काळात वर्णव्यवस्थेला छेद देऊन कबीर, सेना न्हावी, सावता माळी, गोरा कुंभार, नामदेव शिंपी आणि तुकाराम वाणी यासारखे बहुजनसमाजातले संत कवी जोरकसपणे पुढे आले खरे... पण, जसं अमेरिकेतही जागतिक–महामंदीच्या पार्श्वभुमीवर आर्थिक–विषमता, बेरोजगारी दूर करणारं व कल्याणकारी–राज्य अथवा welfare state संकल्पना राबवणारं फ्रँकलिन रुझवेल्ट यांचं 'न्यू–डील' आलं...मात्र, पुढील काही दशकातच 'भांडवली–व्यवस्थे'नं पुन्हा उचल खात 'न्यू डील' मोडून काढलं. आणि, त्यानंतर, आजतागायत Neoliberalism किंवा नवउदारमतवाद नावाच्या नववसाहतवादाच्या नावाखाली खाजगीकरण,




आपल्याकडच्या '४ काळ्या कामगार–संहितां'सारखे 'कामगारविरोधी कायदे' करुन कामगारवर्गाचं खच्चीकरण व आर्थिक–विषमते'चा नंगानाच, अमेरिका–भारतासह जगभर चालूच ठेवलाय...तशीच, मुस्लिम–राजवटीतील बहुजन–साहित्याच्या सुवर्ण–काळानंतर आपल्याकडच्या वर्चस्ववादी वर्णव्यवस्थेनं पुन्हा उचल खाल्ली आणि ती सगळी साहित्यिक काव्य–व्यवस्था सवर्णांच्या बेड्यात अडकून पडली; ती थेट नारायण सुर्वे यांनी २०व्या शतकाच्या उत्तरार्धात मोकळी करेपर्यंत. त्यांनी फक्त, कृत्रिम रंगांसोबत गिरणीतल्या वस्त्राला आपल्या घामाचाही रंग देणाऱ्या गिरणी–कामगारांचीच व्यथा मांडली नाही; तर, पोटाची खळगी भरण्यासाठी वस्त्रहीन अवस्थेत गिऱ्हाईकाच्या घामाचा रंग आणि गंध, आपल्या देहावर चढवणाऱ्या वेश्यांचाही 'श्रमिक' म्हणून वेगळा विचार केला... 'कामगार' या नात्याने, वेश्यांचेही प्रश्न सोडवण्याचा व त्यांचा यातनामय प्रवास सुकर करण्याचा प्रयत्न केला होता... कुबेरांच्या गिरीशासारखे सांपत्तिक 'कुबेरी' व पत्रकारितेतली 'सुभेदारी' उभारण्याच्या स्वार्थकार्यात ते मग्न नव्हते!

राजन राजेंच्या या घणाघाती भाषणानंतर, 'लोकसत्ते'चं दि. २४ नोव्हेंबरचं बनावट व प्रक्षोभक संपादकीय, कामगारांनी मिळून ठाण्यातील 'लोकसत्ता' कार्यालयासमोरच जाळले... विशेष म्हणजे, या 'लोकसत्ते'च्या प्रतिकात्मक दहनानंतर गोखले रस्त्यावर पडलेली राख, सुसंस्कृत–नागरिक, या नात्याने सगळ्या कामगारांनी गोळा करुन रस्ता पूर्वीसारखाच स्वच्छ करुन ठेवला!

**प्रश्न क्र.१ : अठराव्या शतकातील क्रूर–अन्यायकारक 'वसाहतवादी' मनोवृत्तीसारखे भयंकर कामगार–कायदे (ज्याला, संस्कृत भाषेत भाजप–संघीय जाणिवपूर्वक 'संहिता' वगैरे गोंडस नावाने संबोधतायत) आणण्याची हिंमत भांडवलदारवर्गाला होतेच कशी?**

**प्रश्न क्र. २ : निवडणुकीत 'बहुसंख्य मतदार' असलेल्या कामगारांच्या मतांची वेळोवेळी भीक मागणाऱ्या राज्यकर्त्यांनाही, ती हिंमत कशी काय होते??**

**प्रश्न क्र. ३ : आणि, जो मराठी वृत्तपत्रीय 'गोदी–मिडीया' आहे (उदा. लोकसत्ता, लोकमत, म.टा. इ.) यांना हे नवे कामगार–कायदे, कसे कामगारांच्या हिताचे आहेत, असं भाजप–संघीय धर्तीवर रेटून खोटं बोलण्याची हिंमत देखील कशी होते???**

वरील तिन्ही प्रश्नांचं उत्तरं, घोडा का अडला, पान का सडलं आणि भाकरी का करपली? ...जसं, न फिरवल्यामुळे, हे एकच आहे!

...तसंच, वरील तिन्ही प्रश्नांचं उत्तर एकच आहे, ते म्हणजे झोपलेला कामगार, वेळीच न जागल्यामुळे!

...ती वेळ होती, देशात Neo-Liberalism म्हणजे, 'नवउदारमतवादी–विचारसरणी' (प्रत्यक्षात, 'नववसाहतवादी') या गोंडस आवरणाखाली 'खाउजा–धोरणा'पश्चात आणल्या गेलेल्या गुलामगिरी व नव–अस्पृश्यतास्वरुप असलेल्या कंत्राटी–कामगार पद्धती'विरुद्ध आवाज उठवण्याची!

...त्यावेळेस, 'कंत्राटी–कामगार पद्धती'विरोधात कामगारांनी कुठलीही राजकीय–जागरुकता न दाखवल्यामुळेच आणि बुडाशी आग लागली असतानाही कामगार...भगवे, हिरवे, पिवळे, निळे झेंडे फुकाचे मिरवत बसल्यामुळेच आजची घृणास्पद व संतापजनक परिस्थिती उद्भवलीय!

लक्षात ठेवा, 'कंत्राटी–गुलामी'विरुद्ध प्राणपणाने लढणारा तेव्हाही एकच नेता, संपूर्ण भारतात होता (केवळ, महाराष्ट्रातच नव्हे)होता व आजही आहे; त्याचं नाव 'राजन राजे'! भांडवलदारांच्या देणग्यांवर चालणारा एकही प्रस्थापित राजकीय पक्ष वा राजकीय नेता, 'कंत्राटी–कामगार पद्धती'विरुद्ध भूमिका घ्यायला तयार होत नाही; हे पाहून विमनस्क अवस्थेत त्याने कंत्राटी–कामगार पद्धत निर्मूलन हाच मुख्य विषय बनवून, कामगारांनी हाती सोपवलेल्या अत्यल्प संसाधनांनिशी आपला स्वतःचा पक्ष, त्याने वर्ष–२०११ मध्ये काढला, ज्याचं नाव धर्मराज्य पक्ष...श्रमिकांसाठी अधर्माचं राज्य संपवू पहाणारा 'धर्मराज्य पक्ष'!

...पण, दुर्दैव हे की, लघुदृष्टीच्या कामगारांनी, खास त्यांच्यासाठीच काढल्या गेलेल्या पक्षाकडे साफ दुर्लक्ष केलं; त्या धर्मराज्य पक्षाकडे प्रसिद्धीसाठी पैसा नव्हता (तो केवळ, कामगारांच्याच थोड्याथोडक्या पैशांवर चालणारा होता; भांडवलदारांच्या बड्या पैशावर चालणारा नव्हे)... पण, नियतीने दिलेली हाती भाषणशैली, लिखाणशैली होती; त्याचा आजवर पराकोटीचा वापर व जीवाचं रान करुन देखील कामगार जागा व्हायला तयार नाही, तर मग वेगळं काय घडणार...???

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# महाराष्ट्रावर आणि मराठी भाषेवर मनापासून प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला हा इतिहास माहीत असायलाच हवा! ...रुद्रेश सातपुते

दक्षिणेतील तामिळनाडुने १९६७ सालीच, आमच्यावर हिंदी भाषा लादली तर आम्ही भारतातून फुटून बाहेर पडू, असा उघड उघड इशाराच तत्कालीन इंदिरा गांधींच्या सरकारला दिला होता. त्यानंतरच्या पहिल्याच निवडणुकीत तमिळ जनतेने काँग्रेसला सत्तेबाहेर फेकून दिले, ते आजपर्यंत!

सांगायचा मुद्दा हाच की, तत्कालीन ताकतवर काँग्रेस सरकारला यू-टर्न घ्यावा लागला, दक्षिणेतील नागरिकांचा रुद्रावतार पाहून...!!! वातावरण तापू लागताच हिंदी भाषेची सक्ती चक्क मागे घेतली गेली आणि (तमिळ + इंग्रजी अशा) दोनच भाषा व्यवहारात ठेवल्या. आजतागायत यात बदल झालेला नाही. पण... भाषिक संघराज्य व्यवस्थेला तडा गेला तो यातूनच! दिल्लीतील सरकारबद्दल संशयाचे वातावरण तयार होत गेले.

संघराज्य व्यवस्थेला तडा जाऊ देण्याचा तोच गुन्हा आता मोदी-शाह पुन्हा करत आहेत. त्यामुळे, 'so called Bharat'चे तुकडे होण्यास वेळ लागणार नाही....

थोडा इतिहास तपासू...त्याही अगोदर, भाषिक आणि प्रांतिक-अस्मितेच्या रक्षणासाठी आंध्रप्रदेशातील १९५२ सालचं पोट्टी श्रीरामुल्लू यांचं ९० दिवसांचं उपोषण, त्यात त्यांचा झालेला दुर्दैवी मृत्यू आणि त्यानंतर, भाषिक अस्मितेपोटी दक्षिणेतील सर्व राज्यांत उसळलेला कमलीचा हिंसाचार, हा इतिहास ज्यांनी अभ्यासला आहे, त्यांना या भारताचं काय होणार, याचा अंदाज आला तर, मुळीच आश्चर्य नाही.

भाषावार प्रांतरचना, ही याच पार्श्वभूमीवर (१९५६) झाली, हे इथे लक्षात घेतले पाहिजे. थोडक्यात काय तर, दक्षिणेतील सर्व राज्यांनी लगेचच व्यवहारिक शहाणपण दाखवत, आपल्या भाषेच्या अस्मितेबाबत कोणतीच तडजोड न करणाची कडक भूमिका घेतली. त्यामुळे दिल्लीतील 'संघराज्य' सरकार नरमले.

आता उरला आपला महाराष्ट्र! हे उत्तर आणि दक्षिण यामध्येच बरोब्बर 'सँडविच' झालेले राज्य...शिवाय 'भारत' हा शब्द उच्चारताच लगेच भावनिक होणारा मराठी माणूस आणि त्यातही, तो सर्वसमावेशक-सहिष्णू !

इतर प्रांतीय लोक मुंबई-महाराष्ट्राकडे, 'सोन्याचं अंडं देणारी कोंबडी' इतक्याच रोकड्या व्यवहारिक नजरेने पहातात, हे आजही अनेक मराठी माणसांच्या लक्षातच येत नाही. तरीही, आपण 'एक देश' तसेच, 'भारत माझा देश आहे', असं म्हणत चक्क ७५ वर्षं ढकलली!

मग काय? कालांतराने, आपला अजेंडा रेटण्यासाठी काँग्रेसने हिंदी ही राष्ट्रभाषा आहे, हा गैरसमज महाराष्ट्रात पसरावायला सुरुवात केली आणि १९६० च्या संयुक्त महाराष्ट्रातील आंदोलनाचे 'Spirit' मारुन टाळण्याचं पाप केलं.

सेनापती बापट, एस. एम. जोशी, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, ताराबाई रेड्डी, अहिल्याताई रांगणेकर, श्रीपाद अमृत डांगे, संत गाडगेबाबा, शाहीर अमरशेख यांची नावं आणि ऐतिहासिक कार्य काळाच्या पडद्याआड झपाट्यानं केलं गेलं; इतकं की, आज आमच्या पिढीतील अनेकांना ही नावं सुद्धा माहित नाहीत.

या कुकर्मात खुद्द यशवंतराव चव्हाण, गोविंदराव तळवलकर, बाळ ठाकरे (उत्तरेतील हिंदुत्व स्वीकारून) ते आजच्या शरद पवार, एकनाथ शिंदेंनी सक्रिय हातभार लावला आहे, असं अनुमान काढण्यास वाव आहे. यात, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतरच्या अगदी सुरुवातीच्या काळात, यशवंतराव आणि गोविंदराव ही अतिशय विद्वान आणि काबील व्यक्तिमत्त्वं महाराष्ट्राला लाभली पण, ती पूर्णपणे काँग्रेसच्याच आहारी गेलेली. त्यामुळेच काँग्रेसचं कटकारस्थान उघड व्हायला वेळ लागला.

यातील यशवंतराव चव्हाण हे राजकीय प्रमुख तर, गोविंदराव तळवलकर हे महाराष्ट्राच्या सारस्वताचे प्रतिनिधी. दोघेही अतिशय बुद्धिमान, उत्तम साहित्यिक...त्यांची अनेक पुस्तकं मी वाचली आहेत.

परंतु, सुरुवातीच्या काळात, विशेषत: १०७ हुतात्म्यांच्या बलिदानातून हा महाराष्ट्र निर्माण झाला आहे, हे विसरुन गांधी-नेहरु /काँग्रेस / दिल्लीतील केंद्र सरकार यांच्या नजरेतून महाराष्ट्राला पहायची अतिशय घातक रीत, त्यांनी या अकारण महाराष्ट्रात रूजवली...नंतर हे पापकर्म (माधव गडकरी वगळता)...केतकर, आवटे, विश्वंभर चौधरींनी मागील पानावरुन पुढे सुरुच ठेवले आहे. आजच्या तरुण पिढीनं, या मंडळींना आज रोखायलाच हवं, अन्यथा महाराष्ट्राच्या दुर्दैवाचे दशावतार कधिही संपणार नाहीत, हे लिहून ठेवा! केंद्राच्या वाढत्या हस्तक्षेपाची सगळ्यात जास्त शिक्षा आज आपला महाराष्ट्र भोगत आहे आणि त्याची पायाभरणी ही अशी सुरुवातीच्याच काळात झाली.संयुक्त महाराष्ट्र समितीची, लगेचच केली गेलेली बरखास्ती, हे त्याच कटकारस्थानाचा भाग!

नंतरच्या काळात शरद पवारांची गुजराती-मारवाडी-जैन भांडवलदारांशी असलेला 'दोस्ताना' सर्वश्रूत झाला. तर, अंबानी-मातोश्रीची जवळीक जगजाहीर झाली. अदानी तर रात्री ११ वा. सिल्वर ओकवर जेवायला येतो...!!!

तिथं, दुसरीकडे मराठी माणसानं हिंदी आणि उत्तरेतील 'हिंदुत्वा'चा स्वीकार केला.परवाच्या बिहारच्या निवडणूकीची महाराष्ट्रात नको तितकी चर्चा! परप्रांतीय लोकं मराठी माणसाला, त्याच्या 'मातृभाषे'ला रस्त्यावरच्या कुत्र्याइतकीही किंमत देत नाही; पण, तरीही आपलाच 'राजकारणी' मराठी माणूस हिंदी भाषेला फाजील महत्त्व देत, परप्रांतीयांची चाटूगिरी करत असतो... त्यामुळे झाले काय? तर, दिल्लीतील सरकार आणि उत्तर भारतातील ८-९ हिंदी-भाषिक राज्यांनी, भारत-भारत करुन येथे जम बसवायला सुरुवात केली.

त्याकाळी, काँग्रेस हाच पक्ष बहुतेक राज्यांत सत्तेवर असल्यामुळे या गोष्टीला विरोध करणे, राजकीयदृष्ट्या परवडले नसते. याची पूर्ण खात्रीच 'त्या' लोकांना असल्यामुळे परिणामी, उत्तरेतील राज्यांनी विकास केलाच नाही, अगदी आजपर्यंत...आणि वाढत्या लोकसंख्येचा भार महाराष्ट्रावर बिनधास्तपणे टाकत गेली!

केंद्रात कुणीही सत्तेत असो, महाराष्ट्राला चेपण्याचेच धोरण कायम राहिले. महाराष्ट्रातून नेतृत्त्व फुलूच दिले नाही आणि आता तर, मोदी-शाहनी महाराष्ट्राची 'महानता'च जवळजवळ संपुष्टात आणून, त्याचं उघडपणे खच्चीकरण केले आहे आणि बिल मात्र, एकट्या एकनाथ शिंदेंच्या नावावर फाडले जात आहे. संघराज्य व्यवस्थेला तडा गेला तो इथेच!

आता, आपण फार मागे न जाता, अलिकडचं उदाहरण लक्षात घेऊ....

नारायण राणे काँग्रेसमध्येच असताना, त्यांनी मुंबईतील पक्षाचा प्रमुख हा मराठीच असावा, अशी आग्रही जाहीर मागणी लावून धरली होती. मराठी भाषिक महाराष्ट्रात, अशी मागणी करण्याचा कोणता गुन्हा राणेंनी केला होता?

परंतु, सोनिया गांधींनी निव्वळ आपला अहंकार दाखवत, राणे यांच्या मागणीला अक्षरश: कचऱ्याच्या डब्यात फेकून दिले आणि संजय निरुपम / कृपाशंकर सिंह सारख्या बिहार /युपीमधून आलेल्या 'उपऱ्या' माणसांची नियुक्ती केली.

इम्पोर्टेड माल यहाँ नहीं चलेगा असं खुद्द राणेंनीच सोनियांना त्यावेळीच खडसावून सांगितलं असतं; तर, बरं झालं असतं... पण, असली हिंमत राणे दाखवू शकले असते, तर शपथ!

सर्वसमावेशकतेचा, निधर्मी असल्याचा; तर, कधी 'हिंदुत्वा'चा बुरखा वा पांघरुण घालणाऱ्या दिल्लीतील सर्वच सरकारांनी, सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबडीप्रमाणे आपल्या महाराष्ट्र-मुंबईला अक्षरश: कापून खाल्ली.

आज शहाजोग झालेल्या काँग्रेसनं काहीही वेगळं केलं नाही. त्यापूर्वी, पण मुंबई काँग्रेसचे (कधीही निवृत्त न झालेले) अध्यक्ष, मुरली देवरा हे इंदिरा गांधींना नियमित फंड पुरवत असत. मुंबई महापालिकेचे आयुक्त, मुंबईचे पोलीस आयुक्त इ. अत्यंत महत्त्वाच्या पदावर नेमणूक करताना ते इंदिरा आणि नंतर राजीव गांधी यांच्यावतीने हस्तक्षेप करीत असत. मुद्दा हा की, हरियाणा निवडणुकीसाठी एकनाथ शिंदे, मुंबईतून अमित शाहना फंड पुरवत असल्याचा आरोप तिथल्या निवडणुकी दरम्यान होत होता. पण, हेच काम मुरली देवरांनी काँग्रेससाठी दीर्घकाळ केलेले आहे. हे वास्तव कुणीतरी सर्व सामान्य जनतेच्या लक्षात आणून द्यायला हवं. परंतु, पर्यायी माध्यमं (lernate Media) आमच्या लहानपणी नसल्यामुळे, या गोष्टी बाहेर पडत नसत. ज्या गोष्टी, त्यावेळी बाहेर पडत नसत, त्याच गोष्टी आज मोदी-शाह उघडपणे करत आहेत, फरक काय तो इतकाच! यातून संघराज्य-व्यवस्थेला केवळ तडेच नाही तर, आता भगदाडं पाडण्याचं काम वेगानं सुरु झालेलं आहे.

आज आपल्याला माहिती देण्यासाठी अनेक 'प्लॅटफॉर्म' उपलब्ध आहेत. मी अनेक वडीलधाऱ्या, अनुभवी आणि पक्षीय राजकारणात न पडणाऱ्या अभ्यासू-अनुभवी मंडळींची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली, सविस्तर चर्चा केल्या. त्यातील सत्याचा भाग सामान्य लोकांपर्यंत पोहोचवणे, ही काळाची गरज मला वाटते...असो.

मुद्दा हा की, हा सर्व इतिहास झाला आणि इतिहास, या विषयाचा उपयोग भूतकाळातील चुका टाकण्यासाठी करायला हवा, तो उगाळण्यासाठी नाही, असं माझं ठाम मत आहे. इतिहास उगाळून मात्र हाती कोळसाच लागणार, असा आपल्या बहुतांश राजकीय पक्ष आणि नेत्यांचा भूतकाळ, हा काळा कुळकुळीत आहे. आता, पुढे काय? पण, आपलं दुर्दैवच असं की, त्याच त्याच चुकांची आपल्याकडून पुनरावृत्ती केली जाते आणि त्यालाच राजकारण-मुत्सद्दी डावपेच असं म्हटलं जातं!

आणि याच घाणेरड्या राजकीय डावपेचांच्या तावडीत अवघा महाराष्ट्र, मुंबई आणि आपलाच मराठी माणूस सापडला आहे...कधी जाणता तर, कधी अजाणता! एकेकाळी मुंबईवर राज्य करणारा हा अनभिषिक्त सम्राट! पण, त्याची त्याच्याच घरात पुरती दुर्दशा करून टाकली...सर्वच राजकारण्यांनी!

कोण आणि कशी सोडवणूक करणार त्याची आणि आपल्या प्रिय महाराष्ट्र देशाची?

'कुसुमाग्रज' मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरुन जाहीरपणे आपल्याला सांगून गेले, मराठी भाषा आज जीर्ण कपड्यात मंत्रालयाच्या दारात भिक मागत उभी आहे.... तिला भरजरी शालू पुन्हा एकदा नेसवून सुशोभित कोण करणार? मराठी माणूस आणि अवघा महाराष्ट्र, अशा कर्तबगार नेतृत्वाच्या शोधात आहे...!!!

**मी महाराष्ट्राचा, महाराष्ट्र माझा !** – *रुद्रेश सातपुते*

# भारतीय मानसिकता आणि नास्तिक्य

***१४, १५, १६ नोव्हेंबर २५ ला वर्धा येथे 'ब्राईट्स सोसायटी' तर्फे नास्तिक परिषद भरवली जात आहे. या परिषदेत जावेद अख्तर, कुमार केतकर, शारदा साठे, गौहर राजा, सुनील सुखथनकर, आलोक राजवाडे, सुरेश द्वादशीवार, अशी मान्यवर मंडळी तीनही दिवस हजर राहणार आहेत. या परिषदेत नास्तिकतेतून विवेक वादाकडे या अनुषंगाने चर्चा होणार आहेत. या परिषदेच्या निमित्तानेर अकोल्याहून प्रसिद्ध होणाऱ्या जनयात्रा या वर्तमानपत्रात गघ यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे तो असा...***

ईश्वराच्या आधाराशिवाय माणूस उभा राहू शकेल का? नीतीमूल्यांची संरचना धर्माच्या पायावर उभी केली आहे, ती ज्ञानाच्या पायावर उभी करता येईल का? उत्क्रांतीवाद मान्य केला, तर सर्वशक्तीमान ईश्वर दुबळा होतो. पण सामान्य जानात ईश्वर दुबळा झाला, तर कोणाला कसलाच धाक राहणार नाही. त्यामुळे नीतिमत्ता ढासळेल आणि नीतिमत्ता ढासळली, तर सर्व समाजव्यवस्थाच रसातळाला जाईल, अशी जाणकारांना भीती वाटते. पण नीतीमत्ता टिकवून ठेवण्यासाठी खरेच का ईश्वराची गरज आहे? मग आज बव्हंशी लोक ईश्वरभक्त असूनही एवढे अनाचार, एवढी अनागोंदी, एवढी अमानुषता का वाढली आहे? मग आपल्या सदसदविवेकबुद्धीचे काय करायचे?

आपण सर्व अनिश्चिततेच्या भोवऱ्यात जगत आहोत, हे स्विकारणे गरजेचे आहे. अनेक प्रश्नांना आपल्याकडे उत्तरे नाहीत, हे जाणून विज्ञानात पुढचे पाऊल टाकले जाते. विज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांने अशी अनिश्चितता स्वीकारायची वृत्ती आधी अंगी बाणवली पाहिजे, तरच त्यांच्या हातून काहीतरी भरीव होऊ शकते. या अनिश्चिततेपासून सुटका नाही. त्यामुळे एकदा का अशी चिकित्सक वृत्ती विकसित झाली की, ती सर्वच न पटणाऱ्या गोष्टींना प्रश्न विचारू लागते. म्हणजे ज्याच्या अस्तित्वाचा कोणताही थेट पुरावा आजवर सापडलेला नाही, तो देव खरेच अस्तित्वात आहे का, असा प्रश्न स्वाभाविक ठरतो.

जे संशोधक देवावर विश्वास ठेवतात, त्यांच्या अन् आस्तिक लोकांच्या देवावर विश्वास ठेवण्यात बराच फरक आहे... जसा 'मला देव असावा असे वाटते' अन् 'देव आहेच' या दोन वाक्यांत फरक आहे. देवाच्या अस्तित्वावर आस्तिक माणसाचा संपूर्ण अन् ठाम विश्वास असतो, तर संशोधकाचा त्याच्या अस्तित्वावर संपूर्ण विश्वास नसतो, समर्पण नसते, तर त्याला एक संशयाचा पदर असतो.

लहानपणापासून धार्मिक वातावरणात वाढलेला तरुण जेव्हा विज्ञान शिकू लागतो, तेव्हा त्याचा देवावरचा विश्वास पहिल्याइतका अभंग अन् संपूर्ण राहूच शकत नाही, असे मला वाटते. अर्थात ही प्रक्रिया एका दिवसात घडत नाही. प्रथम त्याला मृत्यूनंतर आयुष्य आहे का? देवाच्या अन् संतांच्या चरित्रांमध्ये जे चमत्कार लिहिलेले आहेत, ते खरेच घडलेत का, असे प्रश्न पडायला सुरुवात होते अन् मग त्याच्या मनात अविश्वासाचा शिरकाव होऊन त्याचे प्रमाण वाढत जाते. तेव्हा त्याच्या वडिलांचा देव अन् त्याचा देव वेगळा व्हायला लागतो. माझ्या बाबतीत हेच घडले अन् अनेक तरुणांना असेच अनुभव येतात, हे मी त्या वयात जाणलेले आहे.

खरी गोष्ट अशी आहे की, आपला समाज स्थितिशील आहेत. गती त्याला मानवत नाही. शारिरीक आळसासोबतच वैचारिक आळसही त्याच्यात भिनला आहे. सखोल विचार करणे, चिकित्सा करणे, शंका उपस्थित करणे, प्रश्न विचारणे अशा वैचारिक 'क्रियां'चा त्याला मनस्वी कंटाळा आहे. त्यामुळे पूर्वसूरींकडून आयत्या मिळालेल्या विचारधनावर तो गुजराण करतो. शिवाय या आळसाची सतत सोबत करत असते ते भय. पोथीत सांगितल्याप्रमाणे आचरण न केल्यास, नवस न फेडल्यास, ग्रहशांती न केल्यास देवाचा वा ग्रहांचा कोप होईल, ही भीती सतत पाठीशी असते. त्याचबरोबर विचारांना विवेकाची बैठक देण्यासाठी जे धाडस लागते, त्याचा पूर्ण अभाव आस्तिकांमध्ये असतो. ही एक वैचारिक दुर्बलताच आहे.

हे भय आणि दुर्बलता लपवण्यासाठी आस्तिक लोक (विशेषत: शिकलेले) त्यांच्याभोवती भारदस्त अशा मोठमोठ्या शब्दांचे जाल विणतात. रंगीबेरंगी शब्दतंतूंचे हे जाल दिसायला सुंदर दिसते आणि त्या आड भय आणि विचारदौर्बल्य ही वैगुण्ये झाकली जातात. मग मोहक शब्दांच्या कोंदणात बसवलेला मूल्यहीन असा 'श्रद्धे'चा खडा त्यांना भावतो. त्यामुळे या शब्दांच्या भूलभुलैयाच्या आधाराने नास्तिकांवरही ते आस्तिकतेचा शिक्का मारण्याची जादू करून दाखवतात.

आस्तिकता आणि नास्तिकता या दोन स्वतंत्र विचारधारा आहेत. आपल्या आजूबाजूच्या सगळ्या समाजातील माणसे काही प्रमाणात आस्तिक तर काही प्रमाणात नास्तिक असतात, पण उघड उघडपणे आपण आस्तिक आहोत, असे सांगणाऱ्यांपेक्षा नास्तिक आहोत, असे सांगणाऱ्यांची संख्या कमी आहे. ज्याची धर्मग्रंथांवर, श्रुती-स्मृती, मंत्र-संहिता, उपनिषदांवर परमश्रद्धा आणि वेदाच्या दिव्यतेवर आस्था आहे, अशांना आस्तिक म्हणतात. तर ज्यांचा वेदावर विश्वास नाही, जे वैदिक सिद्धांतावर तर्क-वितर्क करतात किंवा धर्मग्रंथांची निंदा करतात ते नास्तिक आहेत. मात्र नास्तिकता म्हणजे एवढेच नव्हे. नास्तिकता म्हणजे विवेकवादी, बुद्धिप्रामाण्यवादी चिकित्सक दृष्टिकोन होय.

आधुनिक कालखंडात भारतातच नव्हे तर जगभरात विज्ञान आणि तंत्रज्ञान याद्वारे माणूस प्रगती करीत आहे. आपण ज्या विश्वात राहतो, त्या विश्वाच्या निर्मितीचे गूढ उकलण्यासाठी याच विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा आधार तो घेतो आहे. कारण धर्म आणि धार्मिक ग्रंथ यांमध्ये त्याला आपल्या विश्वनिर्मितीची उत्तरे सापडली नाहीत, म्हणून त्यांची नव्याने चिकित्सा तो करू पाहतो आहे. आपल्या तर्काला जे पटेल ते स्विकारण्याकडे त्याचा कल वाढतो आहे. त्यातूनच तो नास्तिक होऊ पाहतो आहे. देव, धर्म यांची चिकित्सा करून त्यांच्या आधारे निर्माण झालेले दांभिक कर्मकांड यांना नाकारत आहे. जात, धर्म, पंथ यांच्या पलीकडे जाऊन माणसाचा माणूस म्हणून विचार करण्याचा प्रयत्न आजचा माणूस करत आहे.

आजची तरुण पिढी यात आघाडीवर असल्याचे चित्र दिसते आहे. धर्माने निर्माण केलेल्या चौकटी तोडून नास्तिक म्हणून जगण्यास कोणताही धोका नाही हे त्यांच्या लक्षात आले आहे. अर्थात आजही अशा नास्तिकांची संख्या कमी आहे, पण ती दिवसेंदिवस वाढत जाईल यात शंका नाही. नास्तिक परिषदेच्या माध्यमातून माणसामाणसातील नास्तिकता वाढवण्यावर, नास्तिक या संकल्पनेविषयी असणारे गैरसमज दूर करण्यावर भर देण्याचा प्रयत्न होतांना दिसतो आहे. तो निश्चितच दखल घेण्याजोगा आहे.

भारतीय परंपरेमध्ये 'बुद्धिप्रामाण्यवाद' हा शब्द जरी नवा असला, तरी या पद्धतीची प्रक्रिया मात्र नवी नाही. 'चार्वाक ऋषींची परंपरा' ही एक वेदकालीन परंपरा आहे. चार्वाक त्या काळामध्ये विवेकवाद मांडत असत. या विवेकवादाचं आजच्या काळातलं आधुनिक स्वरूप म्हणजेच बुद्धिप्रामाण्यवाद, असं आपल्याला म्हणता येईल. चार्वाकांचा विवेकवाद 'प्रत्यक्ष प्रमाण अधिक अनुमान' या स्वरूपाचा होता. म्हणजे प्रत्यक्ष प्रमाण अधिक अनुमान याच्या आधारावर जीवनातल्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर आपण शोधलं पाहिजे. जीवनात जे सत्य आपल्याला शोधायचं आहे, त्याचं उत्तर प्रत्यक्ष प्रमाण आणि त्याच्या आधारावर केलेले अनुमान यातूनच आपल्याला मिळणार आहे किंवा तसं सत्य आपल्याला शोधता येणार आहे, या पद्धतीची चार्वाकांची मांडणी होती.

आपल्यात अनेक जण विवेकी असतात. त्यांना श्रद्धा, विश्वास, देव, धर्म, रूढी-परंपरा, सण-उत्सव या सर्व गोष्टींपैकी बहुतेक गोष्टी अजिबात पटत नसतात. संस्कृतीचा भाग म्हणून, कुटुंबियांच्या भावना दुखवू नयेत म्हणून आपण अनेकदा प्रवाहपतितांसारखे काही गोष्टी पाळतो. देव-धर्म पाळण्यातले, पूजा-अर्चा करण्यातले फोलपण समजूनही सामाजिक बंधने म्हणून, तसेच 'हे केल्याने काही नुकसान तर होत नाही ना' असे म्हणून आपल्यापैकी अनेक जण या गोष्टी करत असतात. त्यांना यात एक भीतीही वाटत असते... बाजूला पडण्याची, एकटे पडण्याची. पण धैर्य दाखवून असे सर्व लोक एकत्र आले, स्पष्ट बोलू लागले तर जगभरातल्या नास्तिकांची संख्या धर्मानुयायांपेक्षा कदाचित् जास्तच भरेल. पण ही सारी 'सायलेन्ट मेजॉरिटी' आहे, म्हणून ती 'मायनॉरिटी' वाटते. 'बाबावाक्यम् प्रमाणम्' ही वृत्ती आपल्या संस्कृतीच्या नसानसांत भिनली असल्यामुळे भारताच्या संदर्भात हे विधान म्हणजे जरा अतीच आशावादी ठरेल.

आधुनिक भौतिक प्रगतीला आध्यात्मिकहीन ठरवून या देशात त्याच भौतिक प्रगतीचा आधार घेत घेत त्यामागील विज्ञानाला पराभूत करण्याचे धंदे चालतात. कितीही उच्च प्रतीच्या अध्यात्मातून, ईश्वराच्या शोधातून, भक्तीतून, तीर्थयात्रा-वाऱ्यांतून, जपतपांतून आज आपण वापरतो, त्यातील साध्यातले साधे अवजारही तयार होत नाही की, आजारही बरे होत नाहीत. म्हणूनच कुठल्याही देवाला अनवाणी जाऊन ना कुणाचा आजार बरा होतो, ना कसलं यश येतं, पण तरीही असल्याच गोष्टींनी आधुनिक तंत्रज्ञानावर स्वार होऊन आपण आपला बिस्तरा पसरवत नेला आहे. कारण तर्कशुद्ध विचार करण्याचं वळण न लावणाऱ्या आपल्या शिक्षणपद्धतीतून बहुतांशी जे बौद्धिक विकलांग निघत रहातात, त्यांना चौकटीबाहेर जाऊन विचार करण्याची हिंमतच होत नाही.

भारतीय मानसिकता ही अंधश्रद्धांना खतपाणी घालणारी आहे. सणवार-उत्सवातील कर्मकांड करणे, हा त्याचा विरंगुळा आहे. कारण माणसे पोकळीत राहू शकत नाहीत. तेव्हा त्यांना पर्याय दिला पाहिजे. माझ्या मते ते सुरुवात अगदी लहानपणापासून केली पाहिजे. मूल... पृष्ठ क्र. १२ वर

# काँग्रेसवाल्यांना झालंय तरी काय...???

गांधी, नेहरुंसारख्या 'जगन्मान्य' ('गोदी-मिडीया'तून रंगवलेले बनावट 'विश्वगुरु' नव्हेत ते) व्यक्तित्वांना, बदनाम करुन सरळ सरळ विस्मृतीच्या गर्तेत ढकलण्याचा प्रयत्न होतो आहे...EC व EVM च्या आधारे बेधडक निवडणुका जिंकल्या जात आहेत; तरीही, काँग्रेसवाल्यांची तू मोठा की, मी मोठा, ही सुंदोपसुंदी संपायला व त्यांची झोप उडायला तयार नाही!

एकटे राहुल गांधी आणि त्यांच्या बहिणीसह त्यांचा एक चमू, लढतो आहे...आणि, बाकीचे काँग्रेसजन तुम लडो, हम कपडे संभालते है असं कालपरवापर्यंत म्हणता म्हणता; एवढ्या अधोगतीला गेलेत की, ते आता, कपडे सांभाळायलाही तयार नाहीत... तेवढीही तसदी, त्यांना घ्यायची नाहीय!

२०१४ पूर्वी अनेक दशके 'सत्तासुंदरी'चा मनमुराद उपभोग घेतल्यानंतरची, ही दारुण व करुण अवस्था आहे, त्यांची...या सगळ्या नाकर्त्या, घरबशा, भित्र्या पदाधिकाऱ्यांना तत्काळ हाती नारळ देण्याची गरज आहे; इतकी, या बहुतेकांची प्रगतिपुस्तकं 'कोरी' आहेत. फक्त, कुठलातरी सोहळा, कुठलातरी कार्यक्रम एकदाचा चटावरचं श्राद्ध उरकावं, तसा जेमतेम पार पाडायचा...समाजमाध्यमांतून त्याचा यथास्थित 'रतीब' टाकायचा आणि हात धुवून 'जितम् मया' म्हणत, ढेकर देत मोकळं व्हायचं, हीच यांची आजची 'रणनीति' उघड उघड दिसतेय.

ज्यांची स्वातंत्र्य-चळवळीत भाग घेताना 'हातभर फाटत होती', जे ब्रिटीशांची (पूर्वी मोगल दरबाराची) 'हुजरेगिरी' करत होते, ज्यांनी कधि नेहरु-गांधींसारख्या वर्षानुवर्षे तुरुंगवासाच्या यातना भोगल्या नाहीत, तेच आज 'पापात्मे'...तुमच्या आमच्या श्रद्धास्थानांवर हल्लाबोल करत, देशात हुकूमशाहीचा नंगानाच करताहेत...EVMमधून दिवसाढवळ्या बिनधास्त मतांवर 'दरोडा' टाकतायत; तरी, काँग्रेसवाल्यांची झोप उडायला तयार नाही...चुकूनमाकून झोपेतून कुठे ते उठलेच; तर, देशहितासाठी निर्धाराने काही निर्णायक स्वरुपाची पावलं टाकण्याची हिंमतच त्यांच्यात उरलेली नाही!

डोळ्यासमोर अंबानी-अदानी सारख्यांच्या काँक्रिटच्या 'पैशाचिक' विकासात, 'सामान्य माणूस' 'अनारकली'सारखा चिणला जातोय, निसर्ग रोज त्यासाठी चिरला जातोय...तरी काँग्रेसचे 'मुखंड' मूग गिळून गप्पच!

...एकतर, त्यापैकी अनेकांनी (त्यात, काही सन्माननीय 'अपवाद' जरुर आहेत) काँग्रेसच्या छत्रछायेत व राजकीय-सत्तेच्या वळचणीला राहून...पचणार नाही, एवढा अफाट पैसा कमावलाय आणि तो राखायचा कसा; याचीच चिंता त्यांना सारखी सतावतेय... तर, दुसऱ्या बाजुला आपण या सैतानी सरकारविरुद्ध जास्तच टूरटूर केली; तर, आपल्या पूर्वकर्मांमुळे उरलेलं आयुष्य तुरुंगात घालवावं लागण्याची, त्यांना साद्यंत भिती वाटते आहे!

...ही सगळी 'कोंडी' फोडायची व न सुटणारी 'कोडी' सोडवायची; तर, एकजात अशा सगळ्याच 'नाकर्त्या व भित्र्या' पदाधिकाऱ्यांसह तथाकथित कार्यकर्त्यांनाही...असंच पोंबाळत बसण्यापेक्षा 'निरोपाचा नारळ' तडकाफडकी देणंच उत्तम! मग काय वाटोळं व्हायचं ते होऊ देत, अधिक काय वाईट होणार काँग्रेसचं? नव्या रक्ताचा शोध घेऊन, त्यांना वाव देण्याची हीच योग्य वेळ आहे; कारण, काँग्रेसचं आता अधिक काही वाईट होऊच शकत नाही...ज्या गांधी-नेहरु-पटेल-मौलाना आझाद-सुभाषचंद्रांच्या काँग्रेस-चळवळीने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं; ती काँग्रेस, 'पक्ष' म्हणून इथून पुढे फक्त मोठा उभारच घेऊ शकतो. तळ गाठून झाला आणि ती घटनादेखील, आता पुरती मागे पडलीय; म्हणूनच, 'काँग्रेसमुक्त-भारत' ही भाषा बोलणारे राजकीय टगे, आता 'EVM-युक्त' असूनही...ती पूर्वीची भाषा बोलत नाहीत, हे कशाचं लक्षण आहे?

जोपर्यंत, देशात निवडणुकीसाठी 'EVM' आहेत... तोपर्यंत, निवडणूक जिंकणं सोडाच; निवडणूक लढणं, आता विसरायला हवं; एवढी या देशाच्या लोकशाहीची लक्तरं, सर्व देशभर आणि जगभर टांगली गेलीयत...तरीही, सापाच्या तोंडात गेलेला बेडूक, बाजुला उडणारा कीटक आपल्या लांबलचक जीभेनं ओढत गिळून टाकतो, तशी या लोकशाहीच्या बनावट उत्सवाची स्थिती, आपली आपणच करुन ठेवलीय आणि ती आपल्यालाच निर्धारपूर्वक सुधारावी लागेल...जय हो!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)




स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान, भारतरत्न पं. जवाहरलाल नेहरु यांच्या, १३७व्या जयंतीनिमित्त धर्मराज्य पक्षाच्या वतीने शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर-२०२५ रोजी, ठाणे शहरातील मुख्य रस्त्यांवरुन एका सांजफेरीचे आयोजन करण्यात आले होते. 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगार-नेते मा. राजन राजे यांच्या यांच्या नेतृत्वाखाली, पक्षाच्या ठाणे-नौपाडा येथील मुख्यालयापासून, सायंकाळी ५ वाजता सुरु झालेली ही सांजफेरी, मीनाताई ठाकरे चौक (कॅसल मिल नाका) येथील, पं. जवाहरलाल नेहरु यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ समाप्त करण्यात आली. सुमारे दीड ते दोन किलोमीटर अंतराच्या या सांजफेरीत मा. राजन राजे यांच्या समवेत, पक्षाचे उपाध्यक्ष श्री. नितीन देशपांडे, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर, महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, पक्षाचे प्रवक्ते श्री. समीर चव्हाण, सचिव श्री. नरेंद्र पंडित, प्रसिद्धीप्रमुख श्री. संजय दळवी, श्री. सोपान चौधरी, श्री. निलेश सावंत, श्री. सुमित कदम, सौ. मनीषा सांडभोर, सौ. भावना ओरपे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह, काँग्रेसच्या अर्थशास्त्र विभागाचे अध्यक्ष व ज्येष्ठ विचारवंत मा. विश्वास उटगी, ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते श्री. राहुल पिंगळे, सरचिटणीस श्री. महेंद्र म्हात्रे, पर्यावरण विभागाचे जिल्हाध्यक्ष श्री. मनोज डाकवे, सांस्कृतिक जिल्हाध्यक्ष श्री. स्वप्नील कोळी, प्रभाग क्र. ८चे राबोडी ब्लॉक अध्यक्ष श्री. जावेद शेख, डाव्या चळवळीतील नेते कॉ. उदय चौधरी आणि डॉ. विवेक कोर्डे इत्यादी मान्यवर मंडळी उपस्थित होती. तसेच, या सांजफेरीत 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे कामगार सभासद व कमिटी सदस्य मोठ्यासंख्येने उपस्थित होते. दरम्यान, या सांजफेरीचे वैशिष्ट्य म्हणजे, जोहरान ममदानी या भारतीय वंशाच्या 'मुस्लिम-समाजवादी' विचारसरणीचे, अमेरिकेतल्या न्यूयॉर्क शहराचे नवनिर्वाचित महापौरांच्या निवडीबाबत, त्यांच्या अभिनंदनाच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी मुंबईतील वरळीजवळील, मेट्रो स्टेशनला (जिथे जगविख्यात 'नेहरु सेंटर' असतानाही) पं. नेहरुंबद्दल आकस बाळगून, जाणूनबुजून 'सायन्स सेंटर' असे नाव देत, नेहरुंचे नावं पुसण्याच्या प्रस्थापित राजकीय नेतृत्वाचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी, गांधी-नेहरु का नाम लेगा, वो ही देश पे राज करेगा, वोट चोर... गद्दी छोड यांसारख्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. त्याचप्रमाणे 'बालदिना'निमित्त, भारतीय-बालकांचा आवडता नेहरु चाचा असा गौरवपूर्ण उल्लेख करीत, मतांची चोरी करुन सत्ताधीश झालेल्या, नरेंद्र मोदींचा 'डिजिटल-चाचा' असा उल्लेख करुन, भाजपच्या धर्मविद्वेशी व बेबंदशाही राजकारणाविरोधात, या सांजफेरीत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. पं. जवाहरलाल नेहरु यांच्या १३७व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या, 'धर्मराज्य पक्षा'च्या या सांजफेरीला ठाणेकर नागरिकांकडून उदंड प्रतिसाद मिळाला. सांजफेरीच्या समाप्तीवेळी मा. राजन राजे यांनी, पं. जवाहरलाल नेहरु यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना, एका लहानग्या बालकाच्या सोबतीने, देशाच्या पहिल्या पंतप्रधानांना विनम्र अभिवादन केल्याने, त्यांची ही कृती समस्त ठाणेकर नागरिकांसाठी कौतुकाचा विषय ठरली.

## भारतीय मानसिकता आणि नास्तिक्य

...पृष्ठ क्र. ११ वरुन

वाढवताना त्याला मोठ्या माणसांना जे धार्मिक संस्कार वाटतात, ते न करता, त्याला खुल्या वातावरणात वाढवणे, वाचनाची गोडी लावणे, विचार करायला शिकवणे, प्रश्न विचारायला उद्युक्त करणे, निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे, अभ्यास म्हणजे निव्वळ चांगले मार्क असे न शिकवता अभ्यास हा प्रश्न समजून (to develop analytical mind) घेण्यासाठी करायला लावणे, आपल्या परिस्थितीची जाणीव करून देणे आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक घटनेमागील कार्यकारणभाव शोधून काढणारा वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवणे, अशा प्रकारे पालकत्वाची भूमिका जर प्रत्येक सुशिक्षित पालकाने पार पाडली तर पुढच्या पिढीत बऱ्याच अंधश्रद्धा कमी झालेल्या दिसतील. ही एक दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे, हे त्याला कळू लागेल. हळूहळू माणूस निसर्गाच्या परिवर्तनशीलतेला अनुसरून स्वतः ही काळानुसार परिवर्तनशील बनेल.

# २१ नोव्हेंबरचा 'हुतात्मा-दिन'च का निवडला गेला...???

भांडवलदारवर्गाकडून 'मालामाल' होणारी व थेट त्यांची 'दलाल' असलेली, भाजप-संघीय 'गुजराथी-लॉबी' व एकूणच त्यांची NDA आघाडी... ४ काळ्या कामगार-संहिता (Black Labour-Codes) लादण्यासाठी २१ नोव्हेंबर हाच दिवस का निवडते...???

**'कंत्राटी-कामगार पद्धती'तल्या गुलामगिरी व नव-अस्पृश्यतेनं महाराष्ट्रातला मराठी-कामगार ग्रासलेला असतानाच...'मराठी-मस्तका'वर अंतिम प्रहार करण्यासाठी व त्यांचं जितंजागतं 'माणूसपण' कायमचं संपवण्यासाठीच** (The last nail in the coffin)...**४ काळ्या कामगार-संहिता** (Black Labour-Codes) **लादली जातेय, हे सर्वप्रथम आपण समजून घेतलं पाहिजे... 'गोदी-मिडीया'तल्या भूलथापांवर अजिबात फसू नका...त्यांचे सगळेच 'मालक' गुजराथी-भांडवलदार आहेत!**

...मग, त्या लादण्यासाठी २१ नोव्हेंबरचा 'हुतात्मा-दिन'च का निवडला जातो; तर, तमाम मराठीजनांना, अत्यंत तीव्र स्वरुपाच्या मानसिक यातना देण्यासाठीच, हे आम्ही कधि समजून घेणार? यादिवशीच, मुंबईसह संयुक्त-महाराष्ट्र आंदोलन पेटलं व त्या आंदोलनातील १०६ हुतात्म्यांनीच आपल्या बलिदानातून महाराष्ट्राला, त्याच्या हक्काची मुंबई, मोरारजींच्या 'गुजराथ'कडून हिसकावून मिळवून दिली होती. लक्षात घ्या, त्यापैकी ८५ हुतात्मे, हे 'गिरणी-कामगार' होते...त्या सगळ्या घटनाक्रमाचाच 'खुन्नस' काढायचा म्हणूनच या कामगारविरोधी कारस्थानी कृत्यासाठी 'हुतात्मा-दिन' निवडला गेला!

**मराठी-माणूस, म्हणजे मुख्यतः 'मराठी-कामगार'च! तेव्हा, या ४ काळ्या कामगार-संहिता** (Black Labour-Codes) **जर, उखडून फेकून देण्याबाबत, जो 'मराठी-नेता' अभिवचन देणार नाही (प्रत्यक्षात, ते 'ब्र' तरी काढतायत का, ते पाहूया)... तो 'मराठी-नेता', हा नेता नसून राजकारणातला 'अभिनेता' आहे, हे खुशाल समजा!**

४ काळ्या कामगार-संहिता (Black Labour-Codes) आता लादल्या गेल्याने काय काय उत्पात होतील, याची अगदी थोडक्यात मांडणी करुया....

कायम नोकऱ्या, आता कायमच्या संपणार; म्हणजे, नोकरीत 'कायम' असण्यानं आयुष्यात जे थोडंबहुत स्थैर्य व सुरक्षितता होती, ती कायमची गेलीच समजा... तेव्हा, लग्न करुन संसार थाटणं, ही एक 'लक्झरी' बाब बनेल, तेव्हा, विवाहवेदीवर चढण्यापूर्वीच एकदम सावधान आणि अगदी हिंमत करुन लग्न केलंतच...तर, मुलं जन्माला घालताना 'डबल सावधान'; थोडक्यात, 'कुटुंब-नियोजना'चा भाजप-संघीय सरकारने निवडलेला एक मार्गच...आणि, यांचे भोंदू संत-महंत आणि यांचे ते मोहन भागवत तीनपेक्षा अधिक मुलं जन्माला घालायला सांगतायत, मोठी अजबच गोष्ट आहे! स्वतः 'अविवाहित' असलेल्या 'त्यांना' विचारा, ही तुमच्या म्हणण्यानुसार मुसलमानांशी स्पर्धा करत, आम्ही पैदा केलेली ढीगभर पोरं...पोसायची कशी आणि त्यांना वाढवायची तरी कशी?

कायम नोकऱ्यांसोबतच कॉरपोरेटीय क्षेत्रातील 'काम गार-चळवळ' हळूहळू संपणार...त्यातून संपासारखे संघर्ष, अगदी 'अपवाद' म्हणूनच, क्वचित कधि यशस्वी ठरणार

'गिग-वर्क्स' (Gig-Workers) वगैरे गोंडस संज्ञा वापरणारे, हे भाजप-संघीय भांडवलदार लोक प्रत्यक्षात, सगळ्याच कामगारांना ''पिग-वर्कस् (Pig-Workers) बनवणार

**नोकरीचा कालावधी अनिश्चित म्हणजेच, नोकरी टिकते की, नाही याची टांगती तलवार... त्यात भरीसभर म्हणून पगारासंदर्भात, कामगार-संघटनांच्या मोठ्या पगार व बोनसवाढीच्या संघटित-करारांसोबत (जे आता होणं, फारच कर्मकठीण) वैयक्तिक-करारांचं कारस्थान (सुरुवातीला त्यासाठी 'लालूच' दाखवतीलच, जशी ती मागे पत्रकारांना दाखवली गेली होती) रचलेले असल्यामुळे, कॉर्पोरेटीय क्षेत्रात सगळीकडे, हे नवे ''पिग-वर्क्स** (Pig-Workers) **कंपनीत प्रचंड दहशतीत वावरताना दिसतील व व्यवस्थापनाने** (Management) **फेकलेल्या पगाराच्या तुकड्यांवर... उकिरड्यावर चरणाऱ्या डुकरांसारखेच आपल्या 'थोटक्या' शेपट्या हलवत 'चरताना' दिसतील**

'हायर अँड फायर' धोरण राबवायची एवढीच हौस आहे; तर, पाश्चात्य देशातलं वेतन, तिथली सामाजिक-सुरक्षा आणि 'अनुचित कामगार प्रथां'साठी (Unfair Labour Practices) व्यवस्थापकांना ३ वर्षांच्या तुरुंगवासासह व्यक्तिगतरित्या फार मोठ्या आर्थिक-दंडाची तरतूदी आणाच...शिवाय, सोबत तिथल्याप्रमाणे कंपनीलाही जबरदस्त भुर्दंड भरायला लावा; यामुळे, कोण कुठला भांडवलदार, भारतातून (मुख्य म्हणजे, महाराष्ट्रातून) 'भांडवल' काढून पळून जाईल, ही फालतू व भंकस भिती घालणं, साफ बंद करा...असले 'भगोडे व लुच्चे-लुटारु भांडवलदार' पळून गेलेलेच बरे, आम्ही शोषित-अपमानित कॉर्पोरेटीय जीणं जगण्यापेक्षा, प्रसंगी शेती करुन झाडपाला खाऊन जगू!

'कंत्राटी-कामगार पद्धती'विरुद्ध लढण्यासाठी जे काही उरलेसुरले (खरंतरं, अगदीच बोथट स्वरुपाचे व वर्षानुवर्षे रेंगाळणारे) कायदेशीर वा न्यायालयीन मार्ग, आता जवळपास पूर्ण बंद होणार

**ले-ऑफ (कामबंदी), कामगार-कपात आणि कंपनी बंद केली जाणं...अगदीच सुलभ होणार. याकामी लागणारी १०० हून अधिक कामगारांची अट काढून टाकून ती ३०० वर नेल्यामुळे ७०% कामगार-कर्मचारी बाधित होणार**

क्षुद्र वा क्षुल्लक कारणांसाठी 'कामगार-संघटनां'ची नोंदणी रद्द केली जाण्याच्या भयंकर तरतुदीमुळे 'कामगार-चळवळ', ही 'कामगार' नावाच्या गांडुळांची 'वळवळ' बनवण्याचा शकुनी-डावपेच

...चला तर, 'हिंदुत्वा'च्या नावाखाली, या ढोंगी-बदमाष हिंदुत्ववाद्यांना...याहीपुढे, असंच 'मतदान' करुया आणि आपली उरलीसुरली इभ्रत व जगण्याची पत, गाव-शहरांच्या वेशीबाहेर टांगूया...त्यांच्या लेखी, आपली तेवढीच लायकी आहे आणि ते त्यांचं म्हणणं योग्यच आहे, हे 'कामगार' म्हणून आपण पुन्हा पुन्हा सिद्ध करत राहूया... हाच, आपल्याला कळलेला-उमगलेला 'कामगारधर्म' होय!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

**संपर्क : समीर चव्हाण (सचिव)** ७०४५००२२७५

---

भांडवलशाहीतील कामगारवर्गाच्या शोषण-अन्यायाला ऊत आणणाऱ्या वर्ष-१९९१च्या नवउदारमतवादी-विचारसरणी अंतर्गत (Neo-Liberal) आलेल्या 'खाउजा' (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण) धोरणामधील 'कंत्राटी-कामगार पद्धती'च्या प्रतिगामी पायावरच... कामगारवर्गाचा शत्रू क्रमांक १ असणाऱ्या भाजप-संघीय सरकारने...आजपासून (दि.२१ नोव्हेंबरपासून म्हणजेच, जाणिवपूर्वक मराठ्यांचा अवमान करण्यासाठी 'हुतात्मा-दिनी'च) गुलामी व नव-अस्पृश्यतेचा वाढता नंगानाच घालण्यासाठी...४ काळ्या कामगार-कायद्यांच्या संहिता (Black Labour-Code) देशभर लागू केल्यात... तेव्हा, भाजपच्या 'NDA'ला मतदान करणाऱ्या कामगारांनो, भोगा आपल्या कर्माची फळं!

EVM वगैरे मधल्या 'मतचोरी'मुळे, हे भांडवलदारांचं पक्कं 'दलाल' असलेलं भाजप-संघीय सरकार, निवडणुकीतील मतदानाच्या 'लोकशाही-प्रक्रिये'नं हटू शकणार नसेल तर...???

***...राजन राजे,*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

**प्रश्न क्र.१ : बिहारी-यूपीवाले कामगार...४ काळ्या कामगार-कायद्यांच्या संहितेला** (Black Labour-Code) **विरोध करतील का?**

**उत्तर :** नाही...कारण, ते 'गुलाम' आहेत!

**प्रश्न क्र.२ : गुजराथी, मारवाडी, जैन तरी विरोध करतील का?**

**उत्तर :** नाही...कारण, ते व्यापारी-व्यावसायिक व उद्योजक असतात; सर्वसाधारणपणे 'कामगार' नसतात म्हणून!

तेव्हा, आजच्या 'हुतात्मादिनी' (दि. २१ नोव्हेंबर-२०२५) आपण मराठ्यांनी दोन प्रतिज्ञा करायच्या....

**प्रतिज्ञा क्र. १ : येणाऱ्या कुठल्याही निवडणुकांमध्ये भाजपच्या NDA आघाडीचा धुव्वा उडवायचा!**

**प्रतिज्ञा क्र. २ :** 'धर्मराज्य पक्षा'च्या एक दुकान, एक मकान (शहरं-उपनगरांतून, प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे) धोरणानुसार, मराठी-तरुणाईला छोटामोठा उद्योगधंदा-व्यवसाय व निवासासाठी सरकारकडून परवडतील, अशा दरात ते मिळण्याकामी...धनदांडग्यांकडून शहरांतील त्यांची 'जादा घरे व दुकाने' सरकारच्या ताब्यात देणारा एक दुकान, एक मकान...कायदा करण्यासाठी लोकशाहीमार्गाने, संपूर्ण यश मिळेपर्यंत प्रचंड दबाव निर्माण करत रहायचा...कारण, 'कामगार' म्हणून जगण्यातला 'राम' आता संपला (अयोध्येत 'राममंदिर' बांधणाऱ्यांनीच संपवला)!

**...राजन राजे**

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# स्वातंत्र्यातील लाचारी आणि मजबुरी, हीदेखील गुलामगिरीच!

*ओ शेठ! तुमची खरेदी झाली ना ?*
*तुमचे फटाके वाजले ना ?*
*दबा धरुन संकट असता*
*दिवाळी करता का?*
*तुमची बुद्धी भ्रष्टली ना?*
*तुमचा विचार खचला ना?*
*गायीसारख्या नोकऱ्या चिरल्या*
*तरी स्वस्थ बसलात ना ?*
*तुमचा धंदा बसला ना?*
*तुमची देणी वाढली ना?*
*कर्जाचा भार वाढूनी*
*ठार बुडालात ना?*
*तुमची शेती बुडाली ना?*
*सत्तेची गोळी घुसली ना?*
*आत्महत्या करण्याची*
*पाळी तुमच्यावर आली ना?*
*तुम्ही डिग्री मिळवलीत ना?*
*पण नोकऱ्याच संपल्या ना?*
*बेकारी विरुद्ध लढण्याऐवजी*
*तुम्ही लाथा खाता ना?*
*तुम्ही ट्रोलर झालात ना?*
*तुम्ही झोलर बनला ना?*
*अंधभक्ताचा शिक्का माथी*
*पक्का बसला ना?*
*सत्ता-माज पिकला ना?*
*तुमचा फज्जा उडाला ना?*
*असत्याचा उत्सव करता*
*तुम्हा लज्जा नाही का?*
*स्वार्थ-भेद सोडा ना!*
*लोक हो, एकत्र व्हा ना!*
*थोडा वेळ उरलाय तोवर*
*स्वाभिमान मिळवाल का ?*

दिवाळीच्या आशा-अपेक्षा, आनंद व्यक्त करतानाही अर्धविराम, पूर्णविराम चिन्हाच्या ऐवजी प्रश्नचिन्हाचा वापर करावा लागावा; इतक्या भयानक मनोवस्थेत आज आपल्या देशाची जनता आहे. श्रीमंतीत धुंदी असते आणि गरिबीत गुंगी असते. देशात सध्या गुंगी आणि धुंदीची मस्ती सारखीच आहे. त्यामुळे डोळ्यांनी दिसणाऱ्या अंदाधुंद राज्यकारभाराकडे स्वतःच्या आणि देशहिताच्या नासधुशीकडे आपण चिडीचूप होऊन पाहतोय!

**भारत हा प्रजासत्ताक देश आहे. प्रत्येक नागरिक हा भारत देशाचा मालक आहे. हे ठाऊक असतानाही, आपलं जगणं हराम करणाऱ्या नेत्याच्या हुकुमाची हमाली करणं, ही गुलामी आहे! गुलामी कळण्यासाठी पारतंत्र्यच हवे का? स्वातंत्र्यातली लाचारी, मजबुरी, स्थितप्रज्ञता; हीदेखील गुलामी आहे. ह्या गुलामीचा त्रास गेल्या ११ वर्षांत खूप काही कमावलंय, अशा मूठभरांना होणार नाही. पण ज्यांना खूप काही गमवावं लागलंय, त्यांना स्वातंत्र्यातल्या ह्या गुलामीचा त्रास होत असणार. असे बहुसंख्याक आहेत. त्यांचा 'अच्छे दिन'चा अंमल कधीच ओसरलाय. आपली झालेली फसवणूक; होणारी फरफट त्यांना समजलीय. पण संघटितरीत्या आवाज उठवण्याची हिंमत अजून होत नाही.**

तथापि, अशी हिंमत हरल्याने वास्तव बदलत नाही. ते अधिक भयाण होतं. हेन्ली अँड पार्टनर्स आणि न्यू वर्ल्ड वेल्थ ह्या आंतरराष्ट्रीय संस्था दरवर्षी श्रीमंत व्यक्तींच्या स्थलांतराचा अभ्यास करून अहवाल प्रसिद्ध करतात. याद्वारे, गुंतवणूक आणि स्थलांतराच्या ट्रेंडचा मागोवा घेता येतो. हेन्ली प्रायव्हेट वेल्थ मायग्रेशन, २०२५च्या ताज्या रिपोर्टनुसार, ३,५०० भारतीय अब्जोपती देशाबाहेर स्थलांतरित झालेत. ही संख्या २०२४ मध्ये ४,३०० होती; तर २०२३ मध्ये ५,१०० होती. ह्या दोन वर्षांच्या तुलनेत चालू वर्षातील स्थलांतरितांची संख्या कमी वाटली, त्यामुळे देशाच्या संपत्तीत होणारी घट प्रचंड आहे. मोदी सरकारच्या गेल्या ११ वर्षांच्या काळात स्थलांतरित अब्जोपतींनी आपल्या बिझनेससह २६.२ बिलियन डॉलर्स; म्हणजे २३२ लाख कोटी रुपयांची संपत्ती विदेशात नेलीय. ह्याला अनेक कारणं आहेत. त्यातील प्रमुख कारणं, गेल्या ११ वर्षांत देशात उद्योगाला पूरक वातावरण नसणे आणि बदलती करप्रणाली, वाढता भ्रष्टाचार; ही आहेत.

काँग्रेसच्या सत्ता काळात विदेशात शिक्षणासाठी जाणारे बुद्धिमान तरुण; शिकून तिथेच स्थायिक होतात; म्हणून ब्रेन ड्रेनची रुदाली मीडियातून गायली जात होती. आता बिझनेसमन अब्जोपतींच्या विदेशी स्थलांतरामुळे ब्रेन ड्रेन बरोबरच मनी ड्रेनची जोरदार गळती सुरू आहे. त्यावर मीडियाने मौन धरलंय. क्रिकेटपटू विराट कोहली लंडनला सेटल झाला; ही बातमी मात्र चिअर्स गर्ल्सच्या उत्साहात दिलीय.

**विदेशात स्थलांतरित झालेल्यांत बिझनेस, व्यापार, कॉर्पोरेट क्षेत्रातील श्रीमंत लोकांप्रमाणे मोठ्या संख्येने उच्चशिक्षित नोकरदारही आहेत. त्यातील अल्ट्रा एच.ए.आय म्हणजे विशेष बुद्धिमत्ता (ह्यात चिटर-फिटर बुद्धीचाही समावेश होतो.) असलेले २ लाख ८० हजार श्रीमंत भारतीय आहेत. हे भारतीय २०२८ पर्यंत भारतात राहिले असते; तर भारताची संपत्ती ३६० लाख कोटी रुपयांनी वाढली असती. तूर्तास, देश सोडून जाणाऱ्या बुद्धिमान भारतीयांची संख्या २०२८ पर्यंत ४ लाख होईल, असा अंदाज आहे.**

ही केवळ माहिती नाही. 'मॉर्गन स्टॅनले', 'आशिया बँक' आणि 'जीडब्ल्यूएम' ह्या जागतिक दर्जाच्या कर्जपुरवठा (फायनान्स) करणाऱ्या कंपन्यांच्या 'सर्व्हे रिपोर्ट'मधील हे संशोधन आहे. बँकांना अब्जोवधी रुपयांचा चुना लावून विजय मल्ल्या- नीरव मोदी यांच्यासारखे विदेशी कर्जबुडवे उद्योजक वेगळे; आणि हे देश सोडणारे श्रीमंत उद्योजक व बुद्धीचे श्रीमंत वेगळे आहेत. ह्यातील उद्योजकांना भारतात सतत भयाचे वातावरण असल्याने देश सोडावा लागला, ही वस्तुस्थिती आहे. ती मोदी-शहा यांच्या 'भाजप सरकार'ला आणि त्यांच्या अंधभक्तांना मान्य होणार नाही. जे सोयीचे आहे, ते आपल्या कर्तृत्वाचे नसले तरी, ते आपलेच असल्याचे दाखवत कौतुकाचे ढोल बडवायचे; आणि जे गैरसोयीचे, ते कर्मफळ आपले असूनही त्यावर देशविरोधी कारस्थानाच्या पिचकाऱ्या मारायच्या, ही 'मोदी-शहा सरकार'ची खोड आहे.

तथापि, अर्थ-कर्जपुरवठा करणाऱ्या कंपन्यांना आपला पैसा व्याजासह वसूल व्हावा; तो अडकून पडू नये; बुडीत खाती जाऊ नये; यासाठी उद्योग-व्यवसायाच्या चलनावलनाची माहिती सतत घ्यावी लागते. विदेशी फायनान्स कंपन्या ही माहिती अधिक खोलात जाऊन घेतात. त्यांच्याकडे भारतासह जगातील सर्वच देशांतील उद्योगांची स्थिती काय आहे? कुठल्या उद्योगांच्या मालाला मागणी, नफा अधिक आहे? कुठल्या उद्योगाला धोका पत्करून आर्थिक पुरवठा केल्यास आपला अधिक फायदा होईल? ह्याचा तपशील ते जमवतात. उद्योगांच्या नफा-तोट्याची कारणं समजून घेतात. मगच, कुठल्या देशातल्या, कुठल्या उद्योगाला अर्थ-कर्ज पुरवठा करायचा, ह्याची 'पॉलिसी' निश्चित करतात. कारण 'अर्थ-कर्जपुरवठा' करणं, हाही एक उद्योगच आहे. तोही आवश्यक ती काळजी घेऊन, अभ्यास-तपासण्या करूनच चालतो. तसाच जागतिक 'सर्व्हे' वरील फायनान्स कंपन्यांनी केला. त्यातून भारतातील उद्योग आणि उद्योजक विदेशी का जातात, तेही स्पष्ट झाले आहे.

**कोणताही उद्योग-व्यवसाय सुरळीत व फायद्यात चालावा, यासाठी केवळ उत्पादनाला मागणी असून चालत नाही. त्यासाठी समाजात शांतता आणि सौहार्दाचे वातावरण असणं; म्हणजे कायदा आणि सुव्यवस्थेचा अंमल असणं, हेदेखील आवश्यक असतं. देशात 'मोदी सरकार' सत्तेत आल्यापासून गेली ११ वर्षे देशाच्या विविध भागात जातीय- धार्मिक तणावाच्या आणि हिंसेच्या असंख्य घटना घडल्यात; घडत आहेत. राज्यांच्या विधानसभा निवडणूक प्रचारात दंगलसदृश परिस्थिती निर्माण होते. 'भाजप' विरोधी सरकार पाडणे; त्या राज्यात अस्थिरता निर्माण करणे, अशा कारवाया सातत्याने घडत आहेत. त्याचे पडसाद देश पातळीवर उमटत असतात. असे वातावरण उद्योग- व्यवसायाला मारक ठरते.**

देशात परकीय गुंतवणूक येत असल्याचे दाखवण्यासाठी सरकारतर्फे मोठमोठ्या आकड्यांची फेकाफेक केली जाते. पण त्याने देश सोडणाऱ्या उद्योजकांच्या संख्येत घट झाली, असे घडले नाही. चुकीच्या पद्धतीने नोटबंदी, जीएसटी आणि 'कोरोना-लॉकडाऊन' लादल्यामुळे करोडो लोक बेकार झाले. ह्या बेकारीत दरवर्षी होणारे कारोबारवाल्या श्रीमंतांचे विदेशी स्थलांतर वाढ करीत आहे.

**हे देशात ७० वर्षे सत्ता उपभोगणाऱ्यांचे कर्मफळ नाही! हे गेली ११ वर्षे देशाचे सत्ताधारी असणाऱ्यांच्या चुकीच्या-खोट्या, निर्णय- व्यवहाराचे फळ आहे. देशहिताला बाधक असं खूप काही घडत आहे, घडणार आहे. 'उद्याची आशा' निराशाजनक ठरू नये, असं वाटत असेल तर भयाण वर्तमानाची कारणं समजून घेतली पाहिजे. त्यासाठी स्वतः पेटलं पाहिजे. प्रकाशमान झालं पाहिजे. अंधाराची तीव्रता दाखवणाऱ्या पणतीसारखं! भारतीय म्हणून ती कर्तव्याची दिवाळी असेल! अन्यथा, कर्माची होळी अटळ आहे!!**

*(प्रसिद्धी: दै. देशोन्नती, रवि. २६/१०/२०२५)*

# अखेर झाडांनीच, सयाजी शिंदेंना मैदानात खेचलं...!!!

कुंभमेळ्यासाठी नाशिकच्या तपोवन परिसरातली अठराशे झाडं तोडण्याचा निर्णय प्रशासनानं घेतला आहे. त्याविरोधात नाशिकमध्ये जनआंदोलन उभे राहिले आहे. झाडे तोडण्यास तीव्र विरोध होऊ लागला आहे, त्याला राज्यभरातून व्यापक समर्थन मिळू लागले आहे. शनिवारी अभिनेते सयाजी शिंदे यांनी या आंदोलनात सहभागी होऊन, सरकारच्या निर्णयाला तीव्र विरोध केला. त्यामुळे वृक्षतोडीविरोधातल्या आंदोलनाला चांगलीच धार चढली आहे.

**सयाजी शिंदे हे सुरुवातीपासून प्रगतीशील विचारांच्या गोतावळ्यात वावरणारे कलावंत आहेत. प्रारंभीचा त्यांचा जो धडपडीचा काळ आहे, तेव्हापासून त्यांची ऊठबस अशा लोकांच्यातच राहिली आहे. सिनेमा/ नाटक हे त्यांचं कार्यक्षेत्र असलं तरी, ते कवी आणि कवितेमध्ये अधिक रमतात. त्याचमुळे मराठीतले अनेक नवे-जुने कवी, सयाजी आपला खास दोस्त आहे, असं हक्कानं सांगतात. सयाजीवर हक्क दाखवतात आणि सयाजीही तो हक्क मान्य करतात.**

आता, कवींच्यातही बरीचशी चलाख मंडळी असतात. कविता लिहित असतात, कधीतरी कवितेतून बंडखोर आवाज व्यक्त होत असतो... पण, नंतर कळतं की, ती बंडखोरी टाळ्या मिळवण्यापुरती असते. तिचा भूमिकेशी संबंध नसतो. भूमिका घ्यायची वेळ आली की, ही मंडळी सोयीस्करपणे अंग काढून घेतात. अशा लोकांना मग कुणी भूमिका विचारायलाही जात नाही. यांचं गणित साधं सरळ असतं, भूमिका घेणं जोखमीचं असतं. सरकारची अवकृपा होते. पुरस्कारांपासून मंडळ, कमिट्यांपर्यंत नियुक्तीचे दरवाजे बंद होतात. आपल्यासाठी सगळे दरवाजे उघडे राहिले पाहिजेत, अशी त्यांची धारणा असते.

सयाजी शिंदे यांनी कधी असा विचार केला नाही. त्यांनी सरकारकडून किंवा आणखी कुठल्या घटकाकडून अशी अपेक्षा कधी केली नाही... पण, गेल्या दहा वर्षांत अनेक अटीतटीचे प्रसंग आले. काही मोजके कलावंत अशा प्रसंगी संघर्षासाठी उभे राहिले, मराठीतले तर अगदीच मोजके. सयाजी शिंदे त्यात कधीच कुठं नव्हते आणि अलीकडे तर, त्यांनी भाजपसोबत गेलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यामुळं त्यांच्याकडून कुणाच्या काही अपेक्षाही नव्हत्या.

मोठा नट आहे, भारतीय चित्रपटसृष्टी गाजवतोय. चित्रपटांत व्यस्त असतानाही, रंगभूमीसाठी वेळ देतोय. 'सखाराम बाइंडर'सारखं अजरामर नाटक करतोय. त्यामुळं कलावंत म्हणून त्यांच्याबद्दलचा आदर कायम होता. त्यांच्या राजकीय भूमिकेशी फारसं कुणाला देणंघेणं नव्हतं.



**या सगळ्या प्रवासात एक गोष्ट घडत गेली. सयाजी शिंदे यांना झाडांचा नाद लागला, ते झाडांच्या प्रेमात पडले. झाडं लावत सुटले. झाडं लावणाऱ्यांना प्रोत्साहन देत राहिले. सयाजी शिंदे पडद्यावर किंवा रंगमंचावर नसायचे तेव्हा, स्वतःच एक झाड बनायचे. झाडांसाठी वाट्टेल ते करायची त्यांची तयारी असायची. हजारो, लाखो झाडं त्यांनी राज्याच्या विविध भागात गेल्या काही वर्षांत लावली. यात झपाटलेपण होतं, तसाच भाबडेपणाही होता.**

म्हणजे, झाडांसाठी झपाटल्यासारखे काम करणारे सयाजी वैचारिक भूमिकेच्या लढाईत कधीच कुठं नव्हते. त्यांचं हे असं कडेकडेनं चालत राहणं झाडांनाही आवडलं नसावं. त्यामुळंच अखेर झाडांनीच त्यांना नाशिकच्या निमित्तानं मैदानात खेचलं आणि सयाजी शिंदे यांच्यासारखा मोठा अभिनेता पहिल्यांदाच सत्तेच्या विरोधात भूमिका घेऊन उभा राहिला. असा तसा नव्हे तर, थेट गिरीश महाजन यांच्याशी माझी दुश्मनी नाही आणि दुश्मनी झाली तरी, त्यानं मला फरक पडत नाही! असं थेट आव्हान देण्यापर्यंत सयाजींनी झाडांसाठी स्वतःला पणाला लावलं आहे. साधू आले-गेले तरी त्याने काही फरक पडत नाही; पण, झाडं गेली तर मात्र नाशिककरांचं नुकसान घेईल! असं म्हटलंय. त्यावरुन काही संधिसाधूंनी कांगावा सुरू केलाय. झाडं तोडायचा निर्णय झाला तेव्हा, हे संधिसाधू काय करीत होते, असे त्यांना कुणी विचारणार आहे का? हा खरा प्रश्न आहे.

**कुंभमेळ्यासाठी झाडं तोडण्याच्या सरकारच्या निर्णयाविरोधात, नाशिकच्या पर्यावरणप्रेमींनी गेले काही दिवस संघर्ष सुरू केलाय. पत्रकार-मित्र निरंजन टकले यांनी आक्रमक भूमिका घेतलीय. सयाजी शिंदे यांनी या संघर्षात स्वतःला झोकून दिल्यामुळं, हा संघर्ष राष्ट्रीय पातळीवरील चर्चेच्या केंद्रस्थानी आला. या नव्या रणभूमीवर सयाजी शिंदे यांचं हार्दिक स्वागत!**

सयाजी शिंदे यांचं मनःपूर्वक अभिनंदन... त्यांनी झाडांसाठी का होईना, सत्तेच्या मुजोरीविरोधात भूमिका घेतली. ते ज्या पक्षात आहेत, असं म्हणतात, तो पक्ष सत्तेत असतानाही त्यांनी भूमिका घेतलीय, हे विशेष उल्लेखनीय. आता परीक्षा दोघांचीही आहे. सयाजी शिंदे यांची आणि पर्यावरणप्रेमींची. कारण, सयाची शिंदे यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे त्यांना आता मोठ्या प्रमाणावर ट्रोलधाडीचा सामना करावा लागेल.

सत्तेतल्या उघड मुजोरांपेक्षा छुप्या टोळधाडींचं आव्हान खडतर असतं. आजवर त्यांना ट्रोलधाडीचा अनुभव नाही. जो हिंदी-मराठीतल्या काही कलावंतांनी यापूर्वी घेतला आहे. पर्यावरणप्रेमींची परीक्षा अशा अर्थाने की, मोठी जोखीम घेऊन आपल्या बाजूनं लढाईत उतरलेल्या एका मोठ्या कलावंताच्या पाठीमागं आपण किती खंबीरपणे उभे राहतोय, हे पर्यावरणप्रेमींना दाखवावं लागेल. कारण, ही लढाई एकट्या-दुकट्याची नाही, ती सामूहिकपणे लढावी लागेल. या लढाईत उतरलेला कुणीही एकटा पडणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल !!!

***....विजय चोरमारे***

## कामगार- धर्माची चार आर्य सत्ये....

१) ही भांडवली-व्यवस्था माझ्यासाठी काम करत नाही; तर, मी त्या व्यवस्थेसाठी काम करतो...केवळ, माझ्या टोकाच्या शोषणातूनच ती चालते व चालू शकते आणि हे दुष्टचक्र थांबवण्याची जबाबदारी माझीच आहे....

२) मी कामगार म्हणून 'राष्ट्रीय-संपत्तीचा निर्माता' आहे; पण, त्या निर्मीत-संपत्तीतून मी आज बेदखल आहे; कारण, माझ्या श्रमाची आणि रक्ताघामाची भांडवलदारांकडून राजरोस चोरी-दरोडेखोरी होतेय आणि ती चोरी-दरोडेखोरी थांबवण्याचा इलाज आहे....

३) ही लुटारु व्यवस्था, अशीच चालत रहावी... काँक्रिटचे अगणित इमले रोज सर्वत्र उभारले जात रहावे, खाजगी (कॉर्पोरेटीय) व सरकारी अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार, ऐय्याशी...अशीच अनिर्बंध चालू रहावी; म्हणूनच, मला मान मोडून 'तुटपुंज्या पगारा'वर जबरदस्तीने काम करायला 'भांडवली-व्यवस्था' भाग पाडते....

४) माझ्या अस्थिर जीवनाचं व तुटपुंज्या पगाराचं 'दुष्टचक्र' थांबवायचं; तर, मलाच राजकारणात सक्रिय पुढकार घेऊन 'कंत्राटी-कामगार पद्धत' आणि '४ काळ्या कामगार-संहिता' (Black Labour-Codes) या दोन्हींचा नायनाट करायला हवा....

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**